POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२९५ ● मुंबई, गुरुवार, २८ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

वांद्रे पूर्वमधील अनधिकृत बांधकाम पाडल्यानंतर हजारो बेघर गेले कुठे?

धक्कादायक माहिती समोर



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबईतील वांद्रे पूर्व येथील रेल्वे स्थानकाला लागून असलेल्या गरीबनगर परिसरात पश्चिम रेल्वेकडून 19 मे ते 23 मे दरम्यान अतिक्रमण हटाव मोहिम राबवण्यात आली. पाच दिवस चालेल्या या मोहिमेदरम्यान सुरुवातीला सुमारे 400 तर अखेरीस जवळपास 500 अनधिकृत झोपड्या आणि बांधकामे जमीनदोस्त करण्यात आल्या. मात्र या कारवाईनंतर येथे राहणारे नागरिक कुठे गेले असा प्रश्न अनेकांना पडला असून याचं संभाव्य उत्तर समोर आलं आहे. येथील बेकायदेशीर झोपडपट्टीत राहणारे हजारों नागरिक त्यांची घरं पाडल्यानंतर कुठे गेले? यासंदर्भात सूचक विधान मुंबईपासून जवळच असलेल्या भागातील माजी महापौरांनी केल्याने या स्थलांतरावरुन नवीन वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

वांद्रे येथील गरीबनगर परिसरात मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पश्चिम रेल्वेने 19 मेपासून 23 मेपर्यंत मोठी अतिक्रमणविरोधी मोहीम राबववली गेली होती. या मोहिमेसाठी 1 हजार 200 हून अधिक पोलिस आणि रेल्वे सुरक्षा कर्मचारी आणि प्रशासन यंत्रणा तैनात करण्यात आली होती. रेल्वेच्या सुमारे 5 हजार 200 चौरस मीटर (1.28 एकर) जागेवरील अतिक्रमण हटवून जागा मोकळी केली आहे. ही जागा वांद्रे टर्मिनसचा विस्तार, पाचवी व सहावी रेल्वे लाईन टाकणे, स्थानिक रेल्वे स्थानकावरील गर्दी कमी करणे आणि सुरक्षा वाढवण्यासाठी वापरली जाणार आहे. वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्सजवळील या जागेची आजच्या काळातील किंमत रु.600 कोटींच्या आसपास आहे.

कुठे स्थलांतरित झाले हे लोक ?

मुंबईतील वांद्रे पूर्व येथे राबवण्यात आलेल्या मोठ्या अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर बेघर झालेल्या नागरिकांचे संभाव्य स्थलांतर आता वसई-विरारमध्ये चर्चेत केंद्रस्थानी आले आहे. "वांद्रेतील बेघरांचे लोंढे वसई-विरारमध्ये येऊ नयेत," अशी स्पष्ट भूमिका वसई-विरार महापालिकेचे माजी महापौर राजीव पाटील यांनी घेतली आहे. शहरातील वाढत्या बेकायदा बांधकामांच्या प्रश्नावर गंभीर इशारा देताना त्यांनी हे विधान केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या असून वांद्रे येथील बेघरांचा मोर्चा वसई-विरारकडे वळाला आहे का? हे लोक वांद्रे येथून वसई-विरारमध्ये हळूहळू स्थायिक होत आहेत का अशी चर्चा सुरु झाली आहे. वांद्रे येथील कारवाईमध्ये शेकडो कुटुंबे पूर्णपणे बेघर झाली असून हजारो रहिवासी प्रभावित झाले आहेत. हे सर्वजण आता वसई-विरारमध्ये स्थलांतरित होत असल्याची चर्चा आहे.

100 घरांचं पुनर्वसन

कारवाई करण्यात आलेल्या वांद्रे येथील झोपडपट्टीमधील सुमारे 100 कुटुंबं/घरं पुनर्वसनास पात्र आहेत. त्यांच्या घरांवरील वरच्या मजल्यांचे आंशिक पाडकाम करण्यात आले आहे. ही घरं तोडण्यात आलेली नाही. ती पुनर्वसनानंतर तोडली जाणार आहेत. मात्र या घरांना एवढं नुकसान झाल्याचं सांगितलं जात आहे की या कुटुंबांनीही घरं सोडून स्थलांतर केल्याची माहिती मिळत आहे.

भारतात इबोला व्हायरसची एंट्री?

नागपूर आणि बंगळुरू विमानतळावर युगांडाहून परतलेल्या 2 प्रवाशांना...

■मुंबई। प्रतिनिधी,

आफ्रिकेतील इबोलाच्या वाढत्या संकटाला पाहता डब्ल्यूएचओ जागतिक आरोग्य आणीबाणी जाहीर केली आहे. त्यानंतर भारत सरकार ॲक्शन मोडमध्ये आहे. पण भारतासह महाराष्ट्रात इबोला व्हायरस ची एंट्री झाली की काय अशी भीती निर्माण झाली आहे. नागपूर विमानतळावर युगांडावरुन एक प्रवाशी परतला आहे. त्यामुळे इबोलाच्या धोक्यामुळे नागपूर विमानतळावर हायअलर्ट वर आहे. या 47 वर्षीय प्रवाशावर आरोग्य विभागाची नजर असून सध्या तरी त्याच्यामध्ये इबोलाचे कोणतेही लक्षणं दिसत नाही आहेत. पण सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून त्याला पुढील 21 दिवस होम आयसोलेशन करण्यात आलं आहे. तसंच रोज आरोग्य विभागाकडून त्याची काळजी घेतली जाणार आहे. भविष्यात जर त्या प्रवाशांमध्ये लक्षणं आढळल्यास रुग्णालयात दाखल करण्यात येईल, असं सांगण्यात आलंय. दुसरीकडे युगांडामधून 28 वर्षीय तरुणी बंगळुरूच्या केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर आली आहे. ती 23 मे रोजी बंगळुरूला आली होती. तिलादेखील इंदिरानगर येथील साथरोग रुग्णलायात विलगीकरणात ठेवण्यात आलंय, असं पीटीआयने सांगितलं आहे. आरोग्य विभागाचे प्रधान सचिव ऋत्विक रंजनम पांडे यांनी या तरुणीबद्दल सांगितलं की, तिच्यामध्ये सध्या तरी इबोलाची कोणतीही लक्षणं नाहीत. पण तिला थकवा जाणवत असल्याने विमानतळ प्राधिकरणाने तिचे रक्ताचे नमुने गोळा केले



आहेत. हे नमुने तपासणीसाठी पुण्यातील राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेला पाठवण्यात आलंय.

इबोलाची मुख्य लक्षणं जाणून घ्या!

- अचानक तीव्र ताप
- प्रचंड अशक्तपणा
- तीव्र डोकेदुखी
- स्नायू दुखणे
- उलट्या, जुलाब
- डोळे लाल होणे
- भूक न लागणे

दरम्यान केंद्र सरकारने इबोला व्हायरलच्या परिस्थितीवर आपलं नरडी नजर असल्याचे सांगितलं आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही. खबरदारी म्हणून भारतातील विमानतळावर आणि इतर प्रवेशद्वारांवर प्रवाशांचे स्क्रीनिंग सुरु करण्यात आले आहे. आफ्रिकन देशांमध्ये इबोला व्हायरसचा संसर्ग वेगाने वाढत असून सर्वाधिक प्रकरणे काँगोमध्ये आढळून आली आहेत. काँगोमध्ये आतापर्यंत इबोलाचे 101 पॉझिटिव्ह रुग्ण

अशोक खरातनंतर आणखी एका भोंदूबाबाचा पर्दाफाश



■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिकचे भोंदू अशोक खरात प्रकरण हे देशभर चर्चेत आहे. महिलांवरील लैंगिक अत्याचार, भाविकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत आर्थिक फसवणूक अशा विविध गुन्ह्यांमध्ये भोंदू खरातच्या न्यायालयीन कोठडी, पोलीस कोठडी अशा वाऱ्या चालू आहेत. दरम्यान नाशिकमध्ये आणखी भोंदूबाबा समोर आला असून या भोंदूबाबाविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

नाशिकच्या इंदिरानगर पोलीस ठाण्यात आश्रम आणि मठ स्थापन करून, विविध समस्यांनी त्रस्त असलेल्या लोकांचे शोषण करणाऱ्या कमलेश शिवकुमार अधिकारी आणि त्याच्या पत्नी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या प्रयत्नांनंतर हा प्रकार उघडकीस आला आहे.

नेमके प्रकरण काय ?

सोलापूर जिल्ह्यातील लऊळ येथील मदन देवकर आणि ज्ञानेश्वर देवकर या दोन पीडित भावांच्या आई-वडिलांचे २०२१ मध्ये अवघ्या एका महिन्याच्या अंतराने निधन झाले होते. आई वडिलांच्या अचानक झालेल्या निधनामुळे दोन्ही भाऊ मानसिक तणावाखाली होते. जो सोबतच एकाच अचानक घडलेल्या घटनेनं भीतीच्या छायेत होते. यावर काहीतरी आध्यात्मिक किंवा दैवी तोडगा मिळावा म्हणून त्यांनी शोध सुरू केला. यादरम्यान त्यांना यूट्यूबवर नाशिकच्या पाथर्डी फाटा येथील भोंदूबाबा कमलेश अधिकारी याची माहिती मिळाली.

अन दोन्ही भावांनी नाशिक गाठले

दोन्ही भावांनी नाशिक गाठून कमलेश अधिकारीची भेट घेतली. तणावाखाली असलेल्या दोन्ही भावांच्या भोळेपणाचा आणि भीतीचा फायदा घेत भोंदूबाबानं त्यांच्या मनाचा ताबा मिळवला. "तुमच्या कुटुंबाचे मागच्या जन्मीचे पाप आहे, तुम्ही राहत असलेल्या जमिनीत दैवी दोष आहे. तिथे गुप्तधनाचा साठा असून अतृप्त आत्म्यांनीच तुमच्या आई-वडिलांचा बळी घेतला आहे. आता तुम्हा दोघांवरही मृत्यूयोग आहे," अशी भीती देवकर बंधूंना त्याने दाखवली.

जळत्या चितेवर चार दिवस अघोरी पूजा

यानंतर भोंदूबाबानं त्यांना मध्यप्रदेशातील उज्जैन येथे बोलावून घेतले. तिथल्या स्मशानभूमीत जळत्या चितेवर चार दिवस अघोरी पूजा करण्यात आली. या पूजेदरम्यान पशूंचा बळी देण्यात आला आणि या नावाखाली 1 लाख 50 हजार रुपये उकळले. त्यानंतर नांदगाव तालुक्यातील पिंपळखेड येथील आश्रमात पुन्हा अघोरी पूजा करून प्राण्यांचा बळी देण्यात आला आणि पीडितांना दारू प्रसाद म्हणून देण्यात आली.

जमीन हडपली अन् आश्रमात बनवले गुलाम

एवढ्यावरच न थांबता या भोंदूबाबानं दोन्ही भावांना त्र्यंबकेश्वर येथील आश्रमात बळजबरीने डांबून ठेवले. त्यांच्याकडून घरगुती कामे करून घेत त्यांचे विविध प्रकारे शोषण केले. तसेच स्वतःचा मठ बांधण्याच्या बहाण्याने त्यांची दोन एकर शेतजमीन फसवणूक करून परस्पर स्वतःच्या नावावर करून घेतली. या संपूर्ण गुन्ह्यात भोंदूबाबा कमलेश अधिकारी याला त्याची पत्नी देखील मदत करत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

शेवटी मदतीला अंनिस पुढे आले

या जाचाला कंटाळून सोलापूरच्या या दोन पीडित भावांनी अखेर नाशिक येथील अंनिसच्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधला. अंनिसच्या कार्यकर्त्यांनी तात्काळ पीडितांना धीर देत इंदिरानगर पोलीस ठाणे गाठले. प्रभारी पोलीस निरीक्षक मनोहर कारंडे यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. पोलिसांनी भोंदू कमलेश अधिकारी आणि त्याच्या पत्नीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक युवराज शिरसाठ करत आहेत. या भोंदूबाबानं अशाच प्रकारे इतर कोणाची फसवणूक केली असल्यास त्यांनी थेट अंनिस किंवा पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नाशिकमध्ये कथित बोगस रेशनकार्ड प्रकरणावरून वाद... घुसखोरांना रेशनकार्ड वाटप झाल्याचा आरोप

मोठी साखळी कार्यरत

कागदपत्रांची अपूर्तता असूनही नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणावर बोगस रेशनकार्ड तयार करून दिली जात आहेत. यासाठी नाशिकच्या पुरवठा विभागात मोठी साखळी कार्यरत असल्याचा आरोप आहे. पुरवठा विभागाकडून इष्टांक संपल्याचे सांगितले जात असले, तरी त्यानंतरही रेशनकार्ड वाटप सुरू आहे. याची त्वरित चौकशी करण्यात यावी, अन्यथा मोठे आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा अखिल भारतीय हिंदू महासभेचे संपर्क प्रमुख बापू डापसे यांनी दिला आहे.

■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिकमध्ये कथित बोगस रेशनकार्ड प्रकरणावरून वातावरण तापले असून, अखिल भारतीय हिंदू महासभेने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांना निवेदन देण्यात आले असून, नाशिक ग्रामीण तहसील कार्यालयातून मंजूर झालेल्या काही रेशनकार्डाबाबत संशय व्यक्त करण्यात आला आहे.

हिंदू महासभेचे संपर्क प्रमुख बापू डापसे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील चुंचाळे आणि अंबड परिसरात मोठ्या प्रमाणावर संशयास्पद रेशनकार्डधारक आढळल्याचा दावा करण्यात आला आहे. काही व्यक्ती बांगलादेशी घुसखोर असल्याचा आरोप करत, त्यांनी रेशनकार्ड मिळवताना कोणती कागदपत्रे सादर केली याची



चौकशी व्हावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

स्थानिक पात्र लाभार्थींना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत असल्याचा मुद्दाही संघटनेने उपस्थित केला आहे. अनेक नागरिकांना वर्षानुवर्षे प्रयत्न करूनही रेशनकार्ड मिळत नसताना संशयित व्यक्तींना सहज रेशनकार्ड कसे मिळाले, असा सवाल करण्यात आला आहे. या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष चौकशी समिती नेमून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, तसेच अपूर्ण किंवा बनावट कागदपत्रांच्या आधारे मंजूर झालेली रेशनकार्ड तातडीने रद्द करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

संघटनेच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या पाहणीत सुमारे १ हजार २०० पीपीपी रेशनकार्डांपैकी जवळपास ६० टक्के कार्ड संशयास्पद असल्याचा दावा करण्यात आला आहे. पुरवठा विभागात यासाठी मोठे जाळे कार्यरत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.


शाळेत प्रवेश द्या... मी अंध आहे, ही माझी चूक आहे का? प्रवेशासाठी अंध विद्यार्थ्याचे आर्त आवाहन

■नाशिक। प्रतिनिधी,

''मी अंध आहे, ही माझी चूक आहे का? मला शिकण्याचा अधिकार नाही का?'' असा हृदय पिळवटून टाकणारा सवाल एका गरीब अंध विद्यार्थ्याने शाळेच्या आवारात उपस्थित करत सर्वांच्या मनाला चटका लावला. सिडकोतील मोरवाडी परिसरातील एका शाळेत इयत्ता सहावीमध्ये प्रवेशासाठी गेलेल्या विद्यार्थ्याला केवळ तो अंध असल्यामुळे प्रवेश देण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

नेमकं प्रकरण काय ?

मोरवाडी भागात राहणारा एक अंध विद्यार्थी आपल्या आईसोबत शाळेत प्रवेशासाठी गेला होता. मात्र विविध कारणे सांगत शाळा प्रशासनाकडून त्याला प्रवेश देण्यास टाळाटाळ करण्यात येत होती. आपल्या



मुलाला शिक्षण मिळावे यासाठी आईची सुरू असलेली धडपड, विद्यार्थ्याच्या डोळ्यातील अश्रू आणि त्याने व्यक्त केलेली वेदना उपस्थितांना अस्वस्थ करून गेली.

दरम्यान, हा प्रकार समजताच शिंदे सेनेच्या नगरसेविका किरण दराडे यांचे पती तथा सामाजिक कार्यकर्ते बाळा दराडे यांनी तातडीने शाळेत धाव घेतली. ''अंध असणे हा गुन्हा नाही. प्रत्येक मुलाला शिक्षणाचा समान अधिकार आहे,'' अशी भूमिका घेत त्यांनी विद्यार्थ्याची आई आणि विद्यार्थ्यासीबत शाळेच्या आवारातच ठिय्या आंदोलन सुरू केले. विद्यार्थ्याला प्रवेश मिळेपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला.

आंदोलनानंतर शाळा प्रशासनाची एकच धावपळ उडाल्याचं पहायला मिळालं. अखेर शिक्षकांनी विद्यार्थ्याचा प्रवेश अर्ज भरून घेतला असून संबंधित विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाईल, असे शालेय व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले. पण घडलेल्या या प्रकारामुळे शाळा प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दारूचा नाद लई बेक्कार! थेट पोलिसांना कॉल केला अन...

■अकोला। प्रतिनिधी,

दारूच्या नशेत वाघापूर येथील एका तरुणाने चक्क पोलिसांना फोन केला आणि खोटी माहिती दिल्याचा प्रकार समोर आला आहे. अकोला तालुक्यातील वाघापूर येथील एका तरुणाने दारूच्या नशेत रात्रीच्या वेळी ११२ डायल नंबरला कॉल करून खोटी माहिती देऊन पोलीसांची दिशाभूल केली. याप्रकरणी रोहिदास गोरक्षनाथ बर्डे (वय ३६) याचे विरुद्ध बी. एन.एस २१२ व मु.प्रोव्ही ॲक्ट ८५ (१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पो.कॉ. मनोहर अशोक मोरे हे अकोले पोलिस स्टेशनला १५ मे रोजी ड्युटीवर असताना रात्री ९.२६ वा वाघापूर येथील रोहिदास गोरक्षनाथ बर्डे याचा MDT वर कॉल आला, त्याला त्याची पत्नी व मेव्हणे मारहाण करून शिवीगाळ करत आहे. याची तात्काळ दखल घेत पो.कॉ मोरे यांनी बर्डे यांना कॉल केला



असता जोराने आरडा ओरड करत मी सहा महिन्यापूर्वी माज्या बायको विरुद्ध तक्रार दिली होती. त्याचे काय झाले असे विचारू लागल्याने त्यांना मोरे यांनी तुमचा तपास पो.हे कॉ. देशमुख याचे कडे आहे त्यांना विचारा नाही तर त्याना तुम्हाला कॉल करण्यास सांगतो असे समजावून सांगितले.

मात्र सदर व्यक्ती ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने तसे अहिल्यानगर ११२ कंट्रोलला कळवून कॉल केला. त्यानंतर सदर इसम बर्डे हा वारंवार कॉल करत होता. सारखे कॉल करत असल्याने रात्री १:२५ वा पो.स.ई. घोडे, पो. कॉ. गोरे यांना घेऊन मोरे शासकीय वाहनाने वाघापूर गावात गेले. तेथे रोहीदास गोरक्षनाथ बर्डे हा मारुती मंदिराचे पाठीमागे उभा होता. त्याने पोलिसांना पाहताच आरडा ओरड करुन मी फाशी घेईन अशी धमकी देत होता. यावेळी पोलिसांनी स्थानिक लोकांसह पंचनामा करून त्याला ताब्यात घेऊन पोलीसांनी अकोले येथे आणले.

ग्रामीण रुग्णालयात त्याची वैद्यकीय तपासणी केली असता तो अमली पदार्थचे सेवन करत असल्याचा अहवाल वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिला. यावरून त्याने सर्व केलेले कॉल खोटे असून दारूच्या नशेत ११२ वर वारंवार कॉल पोलीस प्रशासनाला त्रास देण्याचे उद्देशाने केले असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी अकोले पोलिसात पो.कॉ. मनोहर अशोक मोरे यांचे फिर्याद वरून दारू पिऊन रात्रीच्या वेळी ११२ डायल नंबरला कॉल करून खोटी माहिती देऊन पोलीसांची दिशाभूल केल्याप्रकारणी रोहिदास गोरक्षनाथ बर्डे याचे विरुद्ध अकोले पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सहकारी करत आहेत.

पतीने पत्नीच्या अंगावर फेकली उकळती कढी

'रोज काय भाजी करावी?' या घरगुती विवंचनेतून रात्रीच्या जेवणासाठी बनवलेली कढी एका विवाहितेसाठी जीवघेणी ठरली आहे. जेवण आवडले नाही या अतिशय किरकोळ कारणावरून संतप्त पतीने आपल्या ३४ वर्षीय पत्नीच्या अंगावर थेट उकळती कढी फेकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नाशिकमधील आडगाव हद्दीतील कोणार्कनगर भागात ही घटना घडली. या अमानुष हल्ल्यात विवाहिता गंभीररीत्या भाजली असून तिच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात पती आणि सासूविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित ३४ वर्षीय विवाहिता सुनीता गौतम कांबळे ही तिच्या पती आणि सासूसोबत कोणार्कनगर येथील चौंडेश्वरीनगर या भागात वास्तव्यास आहे. गुरुवारी रात्री १०.३० च्या सुमारास घरात नेहमीप्रमाणे जेवणाची वेळ झाली होती. सुनीताने रात्रीच्या जेवणात कढी बनवली होती. पती घरी आल्यानंतर तिने त्याला गरम कढी आणि जेवणाचे ताट वाढून दिले. मात्र, ताटात कढी पाहताच पतीचा पारा चढला. मला कढी आवडत नाही, तरीही का बनवली, रोज काय हेच बनवते? असे म्हणत पतीने सुनीताशी वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद सुरू असतानाच सासूने देखील मध्यस्थी करत सुनेविरुद्ध पतीला चिथावणी देण्यास सुरुवात केली. सासूच्या चिथावणीमुळे पती आणखी हिंसक झाला. त्यानंतर त्यांच्यातील वाद थेट हाणामारीवर पोहोचला. संशयित पतीने आधी पत्नीला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्यांचा राग एवढ्यावरच त्याचा राग शांत झाला नाही. तर त्याने गॅसवरून उतरवून आणलेली उकळत्या कढीची वाटी थेट सुनीता यांच्या अंगावर भिरकावली. उकळती कढी अंगावर पडल्यामुळे सुनीता यांच्या मानेच्या डाव्या बाजूचा खालचा भाग, पाठ, डावा खांदा आणि दंड गंभीररित्या भाजले. गरम कढीमुळे त्वचा भाजल्याने त्यांना प्रचंड वेदना झाल्या. एवढा अमानुष छळ करूनही सासरच्यांचे मन भरले नाही. त्यांनी सुनीता यांना पुन्हा मारहाण केली आणि या घटनेबाबत कोणालाही सांगितल्यास जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. शेवटी पीडितेला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या भयंकर घटनेनंतर पीडित सुनीता कांबळे यांनी दिलेल्या जबाबावरून आडगाव पोलीस ठाण्यात पती आणि सासूविरोधात कौटुंबिक हिंसाचार, अमानुष मारहाण आणि गंभीर दुखापत केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे नाशिक परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

मुंबईकर मुलीची माणगाव तालुक्यात निर्घृण हत्या मृतदेह जंगलात फेकला, परिसरात भीतीचं वातावरण

■रायगड। प्रतिनिधी,

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात एका १५ वर्षीय मुलीची निर्घृण हत्या करून तिचा मृतदेह जंगलात फेकून दिल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.मिळालेल्या माहितीनुसार, निधी राकेश उतेकर ही १५ वर्षीय मुलगी आपल्या कुटुंबासोबत मुंबईतील विलेपार्ले येथे राहत होती. उन्हाळी सुट्ट्यांमुळे ती आई-वडील आणि भावासह माणगाव तालुक्यातील घरोशीवाडी येथे गावी आली होती. निधी ही विलेपार्ले येथील सेंट जेव्हियर्स शाळेत शिक्षण घेत होती आणि नुकतीच नववीची परीक्षा उत्तीर्ण झाली होती.सोमवारी (२५ मे) रात्री सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास निधी वडिलांच्या मोबाईलवर बोलत घराबाहेर पडली. मात्र त्यानंतर ती परत घरी आलीच नाही. कुटुंबीयांनी रात्रीभर तिचा शोध घेतला, मात्र काहीच माहिती मिळाली नाही. अखेर बुधवारी (२७ मे) घरोशीवाडी परिसरातील जंगलात एका मुलीचा मृतदेह आढळल्याची माहिती समोर आली. त्यानंतर पोलिसांनी कुटुंबीयांना घटनास्थळी बोलावले असता मृतदेह निधीचाच असल्याचे स्पष्ट झाले.



जंगलात सापडला मृतदेह, शरीरावर जखमांचे निशाण

निर्जन जंगलभागात सापडलेल्या मृतदेहावरील जखमा पाहता हा खून असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. घटनेची माहिती मिळताच माणगाव पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. फॉरेन्सिक टीम आणि श्वान पथकानेही घटनास्थळी तपास सुरू केला असून परिसरातील पुरावे गोळा करण्यात येत आहेत.दरम्यान, निधीचा मृतदेह माणगाव उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी ठेवण्यात आला आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण आणि या प्रकरणामागील धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता आहे.

या घटनेमुळे माणगाव परिसरात संतापाची लाट उसळली असून अल्पवयीन मुलीच्या हत्येमुळे नागरिकांनी आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी केली आहे. पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, कॉल डिटेल्स आणि संशयित व्यक्तींची चौकशी केली जात आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

झळा या लागल्या जिवा!

महिन्याचा शेवटचा आठवडा चालू झाला आहे. उष्णतेचा पारा प्रतिवर्ष उच्चांक गाठत आहे. ४७ अंश (डिग्री) सेल्सियसच्या पुढे तापमान जात आहे. कदाचित पुढच्या वर्षी भारतात ५० अंश सेल्सियस तापमान गेले, तर आश्चर्य वाटणार नाही. काही दशकांपूर्वी ३० अंश सेल्सियस इतके तापमान उन्हाळ्याच्या काळात असे. हळू हळू जागतिक स्तरावर उष्णतेत वाढ होत गेली आणि भारतातील तापमान आज ४७ अंश सेल्सियसवर पोचले. 'ग्लोबल वॉर्मिंग' (पृथ्वीच्या वातावरणातील सरासरी तापमानात होणारी दीर्घकालीन वाढ) विषयीची चेतावणी काही दशकांपूर्वी दिली गेली होती; मात्र कोणत्याही देशाने त्यावर युद्धपातळीवर उपाययोजना काढली नाही. त्यात भारताचाही समावेश आहे. त्यामुळे आज केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण पृथ्वीचे तापमान वाढले आहे आणि प्रतिदिन वाढत आहे. यामुळेच बर्फाच्छादित डोंगर, तसेच अंटार्टिका आणि आर्टिक (उत्तर आणि दक्षिण) ध्रुवांवरील बर्फ वितळू लागला आहे. भारतात हिमालयाचीही हीच स्थिती दिसून येत आहे. 'येत्या काही वर्षांत जगातील समुद्रकिनाऱ्यांवरील भाग पाण्याखाली जातील', अशी चेतावणी तज्ञांनी काही वर्षांपूर्वीच दिलेली आहे. ती खरी ठरणार, यात शंका नाही; कारण सध्याची स्थिती पहाता त्यावर कठोर उपाययोजना काढतांना किंवा सांगितलेल्या प्रयत्नांवर कृती करतांना कुणी दिसत नाही. जगातील मोठ्या लोकसंख्येला तर याविषयी कल्पनाच नाही. ज्यांना कल्पना आहे, त्यांना याचे गांभीर्यच नाही. ही स्थिती पृथ्वीच्या विनाशाकडे जाणारी आहे. जगात तिसरे महायुद्ध होण्यावर चर्चा होत असतांना पर्यावरणाच्या हानीकडे मात्र दुर्लक्ष केले जात आहे. आज भारत जगातील सर्वाधिक उष्णतेचा सामना करणाया देशांपैकी एक बनला आहे. अलीकडील अहवालानुसार भारतातील ९७ शहरांना 'अती-उष्ण' क्षेत्रांतर्गत वगीकृत करण्यात आले आहे. यामागे केवळ 'एल् निनो'सारखी नैसर्गिक चक्रे नाहीत, तर मानवनिर्मित कारणे आहेत. यात मुख्य म्हणजे क्राँक्रीटचे जंगल! शहरांमधील काँक्रीटची बांधकामे उष्णता शोषून घेतात आणि ती रात्रीही उत्सर्जित करतात. यामुळे शहरांचे तापमान ग्रामीण भागापेक्षा ५ ते ७ अंशांनी अधिक असते. या काँक्रीटच्या 'जंगलां'साठी म्हणजे तथाकथित विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाली आहे आणि होत आहे. शहरीकरणाने नद्या, नाले आणि तळे बुजवली आहेत. ज्यामुळे निसगार्ची वातानुकूलन यंत्रणा नष्ट झाली आहे. दुसरीकडे आपण घराबाहेरची उष्णता अल्प करण्याऐवजी घराच्या आत थंड रहाण्यासाठी वातानुकूलन यंत्राचा (एअर कंडिशनर्सचा) वापर करतो. त्यातून बाहेर पडणारी गरम हवा वातावरणातील उष्णता अधिकच वाढवते. परिणामी केवळ घामाच्या धारा नाहीत, तर आयुष्याची होरपळ होते. वाढत्या तापमानाचे परिणाम केवळ 'उष्णता' या शब्दापर्यंत मर्यादित नाहीत, तर त्याचा आरोग्यावरही मोठा परिणाम होतो. उष्णतेच्या लाटांमुळे उष्माघाताचे प्रमाण वाढले आहे. मूत्रपिंडाचे आजार आणि मानसिक तणाव यांमुळे मृत्यूदरात वाढ होत आहे. वाढत्या तापमानामुळे पिके करपून जात आहेत. विशेषतः गहू आणि तांदुळ यांच्या उत्पादनावर याचा विपरीत परिणाम होत असून भविष्यात उपासमारीचे संकट ओढवू शकते. वाढत्या उष्णतेमुळे बाष्पीभवन वेगाने होत आहे, ज्यामुळे भूगभार्तील पाण्याची पातळी खालावून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तीव्र होत आहे. जागतिक स्तरावर उष्णता वाढण्यामागे औद्योगीकरण हेच सर्वांत मोठे कारण आहे. औद्योगीकरणामुळेच सर्व प्रकारचे प्रदूषण होत आहे. मानवाने विज्ञानाच्या आधारे जगाचा जो काही विकास केला आहे, तोच विकास या पृथ्वीच्या विनाशाला कारण ठरत आहे. १०० वर्षांपूर्वी जगात स्वच्छ पाणी, हवा आणि आकाश होते, तर जंगलांनी मोठा भूभाग व्यापला होता. आज पाहिले, तर पाणी अस्वच्छच नाही, तर त्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे. हवा प्रदूषित झाल्याने विविध आजार होत आहेत, तर आकाश निरभ्र किंवा निळे दिसणे दुर्मिळ होऊ लागले आहे. जंगल म्हणजे हरित पट्टा प्रतिदिन नष्ट होत आहे. त्यामुळे उष्णता अल्प करण्यासाठी प्रथम विज्ञानाद्वारे होणारा विनाश थांबवणे आवश्यक आहे. जे सर्वाधिक कठीण झाले आहे. आज जागतिक स्तरावर जग जवळ आले आहे. त्यासाठी लागणारी संपर्क यंत्रणा निर्माण करण्यासाठी उद्योगांची आवश्यकता असते आणि हेच उद्योग बंद होऊ शकत नाहीत. तसे करायचे असेल, तर सर्व काही नैसर्गिक स्तरावर करायला हवे आणि जे आता शक्य होणे कठीण आहे. कोरोनाच्या काळात जगात 'लॉकडाऊन' केल्याने अनेक ठिकाणी पर्यावरणात पालट जाणवला होता. सर्वकाही स्वच्छ झाले होते. भारतात यमुना नदी स्वच्छ दिसू लागली होती. पंजाबमधून हिमालय दिसू लागला होता. याचाच अर्थ म्हणजे आज जगात जे काही चालू आहे त्या सर्वांचा परिणाम जागतिक पर्यावरणाचा ऱ्हास होण्यात होत आहे. तेच थांबवणे आवश्यक आहे. प्रत्येक देशातील शासनकर्त्यांना याची जाणीव आहे; मात्र ते करणे अवघड आहे. त्यातही काही गोष्टी आतापासून करता येऊ शकतात. त्यात जीवाश्म इंधनाचा वापर पूर्णपणे थांबवून सौर आणि पवन ऊर्जा यांचा वापर करणे, मोठ्या स्तरावर वृक्षारोपण करून झाडे जगवणे, घनदाट जंगल निर्माण करणे आवश्यक आहे. यामुळे प्राणवायूत (ऑक्सिजनमध्ये) वाढ होऊन शीतलता निर्माण होईल. जेव्हा विज्ञानाचे सर्व मार्ग अपुरे पडतात, तेव्हा अध्यात्म आपल्याला शिकवते. वाढत्या उष्णतेचे मूळ कारण मानवाचा अती-उपभोग आहे. अध्यात्मानुसार जगणारी व्यक्ती उपभोगाऐवजी त्यागाला महत्त्व देते आणि तसे आचरण करते. विज्ञानाद्वारे लावण्यात आलेले सर्व शोध हे उपभोगासाठीच असतात. मग ते मिळवण्यासाठी निसगार्ला ओरबाडले जाते आणि हाच निसर्ग परत जीवसृष्टीची हानी करतो. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांशी आपली नाळ तुटली आहे. आपण आकाशाचा वापर ओझोन थराच्या विनाशासाठी केला, पृथ्वीचा वापर कचरा डेपो म्हणून केला आणि जलाचा वापर प्रदूषणासाठी केला. ही एक प्रकारची पापाची कृती आहे, ज्याचे फळ आपल्याला उष्णतेच्या रूपात मिळत आहे. अध्यात्मानुसार निसर्ग हा देव आहे. निसर्ग प्रत्येक जिवाला देत असतो. त्याच्याकडून कधीच काही घेत नाही; मात्र स्वार्थी मनुष्य त्याच निसर्गाला नष्ट करून आत्मघात करत आहे. यामुळे प्रत्येकाला अध्यात्म शिकवणे आणि त्याचे आचरण करण्यास सांगणे आवश्यक झाले आहे. 'पृथ्वी वाचली, तरच आपण वाचू', हा विचार आता कृतीत आणण्याची वेळ आली आहे.

मुंबई महापालिका नव्या उत्पन्नाच्या शोधात

मुबईकरांना नागरी सुख-सुविधा पुरवणारी मुंबई महानगरपालिका आता उत्पन्नाच्या बाबतीत पिछाडीवर पडत चालली आहे. जकात कर बंद झाल्यापासून पालिकेचे हक्काचे आणि सर्वात मोठे उत्पन्नाचे साधन बंद झाले आहे. सध्या केवळ मालमत्ता कर आणि पाणीपट्टी या दोनच मुख्य स्रोतांवर पालिकेचा गाडा सुरू आहे आणि त्यातूनच पालिका मुंबईकरांच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. आता याचाच एक भाग म्हणून पालिका आयुक्तांनी एक नवा आणि महत्त्वाकांक्षी प्रस्ताव तयार केला आहे. २०१७ पासून ओसाड पडलेल्या मुंबईच्या वेशीवरील जुन्या जकात नाक्यांच्या जागांचे रूपांतर अत्याधुनिक 'बस टर्मिनल' आणि 'पार्किंग हब'मध्ये करण्याची ही योजना आहे. मात्र, या योजनेतून पालिकेला अपेक्षित असलेले ध्येय खरोखरच साध्य होईल का? मुंबईकरांच्या थेट जिव्हाळ्याच्या असलेल्या याच विषयावर आणि प्रकल्पाच्या उद्देशावर प्रकाश टाकणारा हा विशेष प्रपंच.

या योजनेअंतर्गत पालिका मानखुर्द जकात नाक्याच्या जागेवर आंतरराज्य बसेससाठी 'पार्किंग हब' साकारणार असून, त्यासाठी तब्बल १,५०० कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. येथे प्रवाशांसाठी थ्री-स्टार हॉटेल्स आणि अत्याधुनिक पार्किंग सुविधा असतील. याच धर्तीवर दहिसर जकात नाक्यावरही थ्री-स्टार हॉटेल, दुचाकी, चारचाकी, बसेस आणि ट्रक्ससाठी पार्किंग हब उभारण्याचे काम सुरू झाले आहे. मुंबईत सध्या इतर राज्यांतून येणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स बसेसमुळे मुंबईकरांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. ही कोंडी फोडण्यासाठी इतर राज्यांतून व शहरांतून येणाऱ्या या बसेसना मुंबईच्या वेशीवर म्हणजेच दहिसर आणि मानखुर्द जकात नाक्यांवरच रोखण्यात येणार आहे. तिथून पुढे प्रवाशांना शहरात येण्यासाठी मेट्रो, बेस्ट बसेस आणि टॅक्सी यांसारख्या सार्वजनिक वाहतुकीचे पर्याय उपलब्ध करून दिले जातील. सध्या दहिसर जकात नाक्याची जागा १८,८६९ चौरस मीटर तर मानखुर्द जकात नाक्याची जागा २९,७७४ चौरस मीटर आहे. या दोन्ही मोक्याच्या जागा सध्या पालिकेच्या कोणत्याही उपयोगात येत नाहीत. त्यामुळे येथे पार्किंग हब उभारल्यास मुंबईतील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होईल आणि पालिकेलाही मोठा महसूल मिळेल, असा पालिकेचा दावा आहे.

मात्र, यात एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. पालिकेचा उद्देश कितीही चांगला असला, तरी हा प्रकल्प प्रत्यक्षात यशस्वी करण्यासाठी अनेक मोठे अडथळे पार करावे लागणार आहेत. मुळात, आजघडीला दररोज सुमारे एक ते दीड हजार खासगी ट्रॅव्हल्स बसेस मुंबईत प्रवेश करतात. संध्याकाळी बाहेर पडताना या बसेस दादर, सायन, चेंबूर, ठाणे, वांद्रे, अंधेरी आणि बोरिवली यांसारख्या प्रमुख नाक्यांवर उभ्या राहून प्रचंड वाहतूक कोंडी करतात. या व्यवसायात मोठे आर्थिक व्यवहार गुंतलेले असल्याने वाहतूक पोलिसांकडूनही या बसेसवर ठोस कारवाई केली जात नाही, हे उघड गुपित आहे. या ट्रॅव्हल्समुळे मुंबईत जागोजागी ट्रॅव्हल्स एजंट्सचे पेव फुटले असून, भाड्याने दुकाने घेऊन किंवा इतर उद्योगांचे परवाने वापरून हे व्यवसाय बिनधास्तपणे थाटले जात आहेत. या संपूर्ण व्यवसायात कोणतेही नियम उरलेले नसून सर्व काही अनियंत्रितपणे सुरू आहे. या बसेस दिवसभर मुंबईतील वेगवेगळ्या रस्त्यांवर बेकायदेशीरपणे पार्क केल्या जातात. यापूर्वी



वडाळा येथील 'ट्रक टर्मिनल' हे आंतरराज्य बस टर्मिनलसाठी राखीव ठेवण्यात आले होते, मात्र खासगी वाहतूकदारांनी त्यात रस न घेतल्यामुळे त्या चांगल्या योजनेचा पार बऱ्या वाजला. त्यामुळे पालिकेच्या या नव्या योजनेला तरी हे खासगी ट्रॅव्हल्स चालक कितपत प्रतिसाद देतील, याबाबत मोठी शंका आहे.

याचे मुख्य कारण म्हणजे, आज खासगी वाहतूकदारांची एक अत्यंत बलाढ्य 'लॉबी' निर्माण झाली आहे, जी आपल्या सोयीनुसार कायदे आणि नियम वाकवून घेते. काही वर्षांपूर्वी मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी 'बाहेरून येणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स बसेसना सकाळी ८ नंतर मुंबईत प्रवेश दिला जाणार नाही', असा नियम करण्यात आला होता. मात्र, या वाहतूकदारांच्या लॉबीने थेट सरकार दरबारी वजन वापरून या प्रस्तावाला कडाडून विरोध केला, नियम वाकवला आणि आपली वाहतूक पूर्ववत सुरू करून घेतली. खासगी बसेसच्या करांमध्ये किंवा टोलमध्ये थोडी जरी वाढ केली, तरी ही लॉबी लगेच सक्रिय होते आणि सरकारकडून आपल्या मागण्या मान्य करून घेते. वाहतूक विभागाने कोणताही कडक नियम लागू केला की, ही लॉबी थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत किंवा वरिष्ठांपर्यंत पोहोचते आणि तो नियम एका-दोन दिवसांत रद्द करून घेण्याची ताकद या वाहतूकदारांकडे आहे. त्यामुळे पालिकेच्या या नव्या प्रस्तावित प्रकल्पाला कितपत ठोस यश मिळेल, याविषयी शंका घेण्यास वाव आहे.

आता या प्रकल्पाकडे प्रवाशांच्या दृष्टिकोनातून पाहणेही गरजेचे आहे. जर या सर्व बसेस दहिसर किंवा मानखुर्द (वाशीजवळ) जकात नाक्यांवरच थांबवल्या, तर लांबचा प्रवास करून आलेल्या प्रवाशांना आपल्या कुटुंबासह आणि जड सामानसुमानांसह तिथे उतरावे लागेल. तिथून पुढे मुंबईतील आपल्या निश्चित स्थळी जाण्यासाठी दुसरा पर्याय शोधणे हा प्रवाशांसाठी एक मोठा 'द्रविडी प्राणायाम' ठरणार आहे. कारण, मुंबईतील सध्याची 'बेस्ट' सेवा किंवा मेट्रो-मोनोचे जाळे या प्रवाशांच्या ओज्याला पूर्णपणे पूरक ठरू शकेल का, हा प्रश्नच आहे. राहता राहिला प्रश्न रिक्षा आणि टॅक्सीवाल्यांचा; अशा मोक्याच्या ठिकाणी रिक्षा-टॅक्सीचालक प्रवाशांची मोठी आर्थिक अडवणूक करण्याची दाट शक्यता आहे. सध्या दादर, वांद्रे टर्मिनस किंवा लोकमान्य टिळक टर्मिनस (कुर्ला)सारख्या दूरच्या स्थानकांवर उतरून मुंबईत आपल्या घरी जाणे प्रवाशांना किती आर्थिक भुर्दंडाचे ठरते, हे आपण रोज पाहत आहोत. प्रशासनाने कितीही कडक नियम केले, तरी अशा ठिकाणी प्रवाशांची आर्थिक पिळवणूक होतेच, हे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही.

नालेसफाईचा दावा तरणार की बुडणार!

महाराष्ट्रात पावसाने आपली झलक दाखवायला सुरुवात केली आहे. आता मे महिना संपत आला आहे. पहिला पाऊस पडला की शहरांच्या विकासाचे दावे वाहून जातात. मुंबईत 'हिंदमाता' तलाव होतो, पुण्यात 'डेक्कन' नदी बनते, नागपुरात रस्ते कालवे होतात. हे दृश्य नवीन नाही. दरवर्षी जून ते सप्टेंबर याच बातम्या, तेच फोटो, तेच पाहणी दौरे सुरू राहतात. फरक फक्त एकच होतो, पाण्याची पातळी वाढते, पण जबाबदारीची पातळी घटत जाते. कारण शहरं बुडत असली तरी लोकप्रतिनिधींना याचे भान नसते. 2005 ची मुंबईची ढगफुटी आजही अंगावर काटा आणते. त्यावेळी 944 मिमी पाऊस झाला. 1000 पेक्षा जास्त बळी गेले होते. शंभर वर्षांत अशी आपत्ती पुन्हा येणार नाही, असे म्हटले जात होते, पण आता दर दोन वर्षांनी मुंबई निम्मी बुडते. कारण आपत्ती नैसर्गिक कमी, मानवनिर्मित जास्त आहे. 26 जुलैच्या मुंबईबुडीच्या चौकशी समितीने 2006 साली 184 शिफारशी दिल्या. मिठी नदीचं रुंदीकरण, पंपिंग स्टेशन, डोंगराळ भागात संरक्षक भिंती. 20 वर्षांत त्यातल्या निम्म्याही पूर्ण झाल्या नाहीत. अहवाल कपाटात आणि शहर पाण्यात अशी स्थिती होत असते. पुण्याची कथा वेगळी नाही. 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' म्हणवणारं शहर पहिल्याच सरीत गुडघाभर पाण्यात असतं. सिंहगड रोड, बिबवेवाडी, कात्रज, वारजे सगळीकडे एकच बोंब असते. कारण मुळा-मुठा नदीच्या पूररेषेत बांधकामाला सर्रास परवानग्या दिल्या. 'रिव्हरफ्रंट डेव्हलपमेंट'च्या गोंडस नावाखाली नदीतच घुसखोरी करण्यात आली. नदीला जागा नसली की, ती मार्ग शोधते. मग ती लोकांच्या घरात शिरते. आयटी हब, स्मार्ट सिटी, मेट्रो सिटी ही सगळी विशेषणं पाण्यासमोर फिकी पडतात. समस्या फक्त जुन्या शहरांची नाही. नव्याने 'स्मार्ट' बनवलेल्या नाशिक, औरंगाबाद, सोलापूरमध्येही तीच कथा आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला फुटपाथसाठी काँक्रीटीकरण केलं, पण पाणी मुरायला एक इंच जागा सोडली नाही. सगळीकडे सिमेंटची जंगले उभारण्यात आली. 'हरित क्षेत्र' फक्त डीपी प्लॅनमध्ये उरले. झाडं तोडली, तलाव बुजवले, टेकड्या फोडल्या. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा गळा घोटला. आता निसर्ग उलटा श्वास घेतोय, त्यामुळे माणसाला धाप लागत आहे. दरवर्षी नालेसफाई हा सफाईपेक्षा मोठा घोटाळा म्हणून चर्चेत येतो. मुंबईत 500 कोटी, पुण्यात 150 कोटी. बिलं निघतात, फोटो सेशन होतात, पण नाले तसेच तुंबलेले राहतात. कारण कंत्राटदार, अधिकारी, नगरसेवक यांची साखळी पक्की आहे. गाळ काढला तर ट्रकच्या ट्रिपा मोजायला पाहिजेत. पण कागदावर 100 ट्रिपा आणि प्रत्यक्षात 10 असतात. उरलेला पैसा वाटून खाल्ला जातो. सीसीटीव्ही लावले तरी कॅमेरा बंद असतो. जिओ-टॅगिंगचे फोटो दुसऱ्याच ठिकाणचे असतात. तंत्रज्ञान आहे, पण प्रामाणिकपणा नाही. ब्रिटिशांनी बांधलेली ड्रेनेज सिस्टीम आजही निम्म्या मुंबईला तारते. कारण त्यांनी दूरदृष्टी ठेवली होती. आपण 75 वर्षांत एकही नवीन मास्टर स्टॉर्म वॉटर ड्रेन बनवू शकलो नाही. 'ब्रिमस्टोवॅड' प्रकल्प 1993 पासून रेंगाळत आहे. 8 पंपिंग स्टेशन्सपैकी 6 अजून बांधून व्हायची आहेत. लोकसंख्या तिप्पट झाली, वाहने दहापट झाली, पण पायाभूत सुविधा तशाच. मग पाणी तुंबणार नाही तर काय होणार? या सगळ्यात भरडला जातो सामान्य माणूस. सकाळी 9 चे ऑफिस गाठायला घरून 6 वाजता निघावे लागते. लोकल बंद पडली की टॅक्सीवाले लूट करतात. हातावर पोट असणाऱ्याचा रोजगार बुडतो. छोट्या दुकानदाराचे सामान भिजून लाखोंचे नुकसान होते. रुग्णालयात जायला रस्ता नसतो. गेल्यावर्षी मुंबईत साचलेल्या पाण्यात वीजप्रवाह उतरून 7 जणांचा मृत्यू झाला. त्याची जबाबदारी कुणी घेतली? कुणीच नाही. कारण नेत्यांच्या घरासमोर 24 तास पंप असतात. मंत्रालयात पाणी शिरत नाही. त्यामुळे त्यांना झळ पोहोचत नाही. उपाय कठीण नाहीत. सिंगापूर आपल्यासारखाच मान्सूनच्या प्रभावातील देश आहे. तिथे 60 टक्के पाऊस एका तासात पडतो, तरी रस्त्यावर पाणी साचत नाही. कारण त्यांनी 'एबीसी वॉटर प्रोग्राम' राबवला. याचा अर्थ ॲक्टिव्ह, ब्युटिफुल आणि क्लिन. प्रत्येक इमारतीवर रेनवॉटर हार्वेस्टिंग, रस्त्याच्या कडेला 'बायो-स्वेल्स', मोठे भूमिगत टँक. टोकियोत नदीखाली 5 स्टेडियमएवढी पाण्याची टाकी आहे. आपल्याकडे इच्छाशक्तीचा दुष्काळ आहे, पाण्याचा नाही. सर्वात आधी राजकीय इच्छाशक्ती हवी. नाल्यांवरची, नदीकाठची सगळी अनधिकृत बांधकामे पाडली पाहिजेत. 'गरीब माणूस राहतो' ही सहानुभूती इथे चालणार नाही, कारण त्याच अतिक्रमणामुळे हजारो गरीबांचे जीव धोक्यात येतात. नालेसफाईची खरे तर जबाबदारी थेट आयुक्तांची असते. पाणी तुंबलं तर महापालिका अधिकाऱ्यांची पगार कपात करून प्रमोशन थांबवायला हवे. प्रत्येक नव्या बांधकामाला 'झिरो नेट रनऑफ' बंधनकारक करा. म्हणजे इमारतीच्या आवारात पडणारा पाऊस त्याच आवारात जिरला पाहिजे. नागरिकांनीही भूमिका बदलली पाहिजे. प्लास्टिक नाल्यात टाकणं बंद करायला हवे. सोसायटीतले चेंबर नियमित साफ करायला हवे. तक्रार फक्त ट्विटरवर न करता, लेखी देऊन पाठपुरावा करायला हवा. निवडणुकीत रस्ता, पाणी, ड्रेनेज या मुद्द्यांवर मत द्या, जाती-धर्मावर नाही. कारण पाणी साचताना ते हिंदू-मुस्लीम बघत नाही. स्मार्ट सिटी म्हणजे ड्रोन शो नाही, स्मार्ट सिटी म्हणजे कोरडा आणि सुस्थितीतील रस्ता ही पहिली गरज. केवळ मेट्रो रेल सुरू करून चालणार नाही. कारण जमिनीवर उतरावेच लागते. कारण नाले तुंबले तर चालणार कसे. जोपर्यंत जागरूक नागरिक म्हणून लोक लोकप्रतिनिधींना जाब विचारत नाहीत, तोपर्यंत सुधारणा होणे अवघड आहे. त्यांच्या नुसत्या पाहणी दौऱ्यांनी पाणी तुंबणे बंद होणार नाही. त्यासाठी कृती हवी. केवळ विदेशी अभ्यासदौरे करून भागणार नाही, त्यासाठी सरकारने प्रामाणिकपणे काम करायला हवे. पण भ्रष्टाचार ही आपल्याकडील व्यवस्थेला लागलेली भयंकर कीड आहे. त्यामुळे समस्या सोडवण्यापेक्षा ती वर्षानुवर्षे तशीच ठेवण्यावरच जास्त भर असतो.

बाजारीकरणामुळे बिघडलेले शिक्षण 'नीट' व्हावे

नीट परीक्षेचा पेपर फुटल्याने विद्यार्थी, पालक आणि संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर अत्यंत गंभीर, दूरगामी परिणाम झाले आहेत. या पेपरफुटीमुळे उच्च शिक्षण क्षेत्रही गैरप्रकारांच्या वाळवीने पोखरले गेल्याचे स्पष्ट झाले. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षणक्षेत्रासमोर अस्तित्वाची आव्हाने आहेतच. नीट पेपरफुटीमुळे दिवसातले 10-15 तास प्रामाणिक अभ्यास करून डॉक्टर बनण्याची स्वप्ने पाहणाऱ्या तरुणाईची निराशा झाली. या तरुण-तरुणींसोबत ही परीक्षा म्हणजे भेसूर थट्टा ठरली. सर्वच क्षेत्रातील उच्च शिक्षणात अडचणी असताना शिक्षणाच्या गैरलागू व्यावसायिकरणाने स्थिती अधिकच गंभीर झाली आहे. आज इंजिनियरिंग किंवा वैद्यकीय शिक्षणासाठी बारावीला महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर संबंधित महाविद्यालयाशी बेकायदा जोडलेल्या खासगी क्लासमध्ये बळजबरीने प्रवेश घ्यावा लागतो. महाविद्यालय अंशतः किंवा पूर्ण अनुदानित असले तरी छुप्या किंवा उघडपणे जोडलेल्या क्लासमध्ये प्रवेश बंधनकारक केला जातो. अशा वेळी अधिकृत संस्थेत केवळ शिक्षण विभागाला रेकॉर्ड दाखवण्यासाठी लेक्चर्स, प्रॅक्टिकल्स घेतले जातात, त्यामागे सरकारी अनुदानाचे गणित असते. या संस्था केवळ जोड-क्लासेसच्या मध्यस्थासारखे काम करतात. विद्यार्थ्यांचा फॉर्म भरून घेणे, पात्रतेची कागदोपत्री पूर्तता करणे एवढेच काम केले जाते. शिक्षकांना मात्र सरकारी अनुदानातून नियमित वेतन मिळते.

काही शाळा तर केवळ प्रॅक्टिकल परीक्षापुरत्या असतात. प्रवेशानंतर हजेरीचे बंधन नसते, पण जोड-क्लासमध्ये प्रवेश अलिखित बंधनकारक असतो. यातून महाविद्यालयाचे शुल्क व क्लासची गलेलठ्ठ फी दोन्ही भरावी लागते. एकाच अभ्यासक्रमासाठी एका संस्थेत तोंडदेखली, तर दुर्सयात बेकायदा नोंदणी होते. हे 'इंटीग्रेशन' इतके सहजसंमत झाले की विद्यार्थी-पालकांचे आर्थिक, मानसिक, शारीरिक शोषण होत असल्याचे मान्यच केले जात नाही. 'हे असंच असतं, डॉक्टर-इंजिनियर बनवायचे तर हे करावंच लागतं' असा हतबल सूर पालकांचा असतो. पण या व्यवस्थेला सरकार, शिक्षणसंस्था आणि क्लासेसच्या व्यावसायिकरणाची सूज वाढवणारे बाजारीकरण जबाबदार आहे. लाखो-कोटींची गणिते यामागे आहेत. एका विद्यार्थ्याकडून क्लासने एक लाख फी घेतल्यास शंभर विद्यार्थ्यांमागे एक कोटी होतात. यातील वाटा अधिकृत संस्थेलाही मिळतो. ही संघटित व्यवस्था असते. क्लासेस जाहिरातींसाठी टॉपर विद्यार्थ्यांची छायाचित्रे वापरतात. तो विद्यार्थी क्लासचा नसला तरी मोबदला देऊन 'मला अमूक क्लासचे मार्गदर्शन मिळाले' असे वदवून



नीट पेपरफुटीने शिक्षण व्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या मेहनतीची क्रूर थट्टा झाली आहे. शिक्षणाच्या बाजारीकरणाने कोचिंग फॅक्टरींचे रॅकेट उभे राहिले आहे. शाळा-महाविद्यालये केवळ कागदोपत्री, तर क्लासेसमध्ये लाखोंची फी घेऊन 'यशाची हमी' विकली जाते. या गैरप्रकारात गुणवत्ता, प्रामाणिकपणा आणि विद्यार्थ्यांचे भविष्य चिरडले जात आहे. व्यवस्थेतील भ्रष्टाचाराने शिक्षणाचे पावित्र्यच गमावले आहे. हे बिघडलेले गणित नीट व्हावे.

घेतल्याचे आरोपही आहेत. काही कनिष्ठ महाविद्यालये अशा इंटीग्रेशनसाठीच ओळखली जातात, पालकांचीही मूक संमती असते.

क्लासमध्येच शिकवायचे तर महाविद्यालये कशाला? केवळ नोंदणीपुरत्या उभारलेल्या महाविद्यालयांवर सरकारचे नियंत्रण हवे. क्लासेसचा फुगा धनिक पालकांनीच फुगवला आहे. त्यामुळे शाळा-महाविद्यालयातील दर्जेदार शिक्षणाची मागणी मागे पडून क्लासेसचा सुकाळ झाला. गल्लीबोळात 90 ते 98 टक्के गुणांची हमी देणाऱ्या क्लासेसचा सुळसुळाट आहे. वातानुकूलित वर्ग, विशेष पात्रताधारक शिक्षक यांची जाहिरात करून बाजारीकरण सुरू आहे. 30-40 वर्षांपूर्वी लातूर पॅटर्न नावाजला जायचा. दहावी-बारावीच्या यशाने शाळेचे नाव उंचावायचे. आता विद्यार्थी कोणत्या क्लासमध्ये होता असे विचारले जाते. टॉपरला आपल्या कळपात घेण्यासाठी क्लासेस उत्सुक असतात. नीट, सीईटी, जेईईसाठी शंभर टक्के यशाची हमी देणाऱ्या क्लासेसचे अर्थकारण पेपरफुटीतून समोर येऊ शकते. विद्यार्थ्यांचा घोडेबाजार लावून जीवघेण्या स्पर्धेत जुंपणारे पालकच दोषी आहेत. जादा फी भरल्यास जादूची छडी फिरल्यासारखे यश मिळेल, अशी शॉर्टकट अपेक्षा बाळगणारा समाजच दोषी आहे. यातूनच 'नीट' पेपरफुटीसारखा घोटाळा घडतो. आधीच पेपर हाती पडल्यावर अभ्यासाची गरज नाही, फक्त आडमागार्ने यश देणारा क्लास निवडला की झाले, हा घातक संदेश सर्वमान्य होणे धोक्याचे आहे. नीट पेपरफुटी उघडकीस आल्यानंतर 3 मे ची मूळ परीक्षा रद्द झाली. आता 21 जून 2026 रोजी फेरपरीक्षा होणार. त्यामुळे 22 लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना पुन्हा मानसिक ताण सहन करावा लागणार. मेहनत करून यश मिळवर्णायांची फुटलेला पेपर वापरर्णाया क्लासेसनी भीषण थट्टा केली. प्रामाणिक, हुशार विद्यार्थ्यांचे खच्चीकरण झाले.

पैशांच्या जोरावर पेपर मिळवर्णायांमुळे गुणवंतांची संधी हिरावण्याची भीती निर्माण झाली. फेरपरीक्षेमुळे वैद्यकीय अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया 1-2 महिने पुढे जाईल. प्रथम वषार्चे सत्र उशिरा सुरू होईल. याचा थेट फटका महाराष्ट्रातील इंजिनियरिंग व फार्मसी प्रवेशालाही बसत आहे, कारण वेळापत्रक कोलमडण्याची शक्यता आहे. या पेपरफुटीतून सरकारी शिक्षण यंत्रणा किती कुचकामी आहे आणि ती बाजारीकरणापुढे हतबल ठरली आहे हे स्पष्ट झाले. शिवाय अधिकृत यंत्रणेत खासगी बाजारासाठी काम करणारी धेंडंही असल्याचे समोर आली. भ्रष्टाचार, शैक्षणिक गुन्हेगारी आणि बाजारीकरणाचे हे उदाहरण आहे. या रॅकेटचे केंद्र महाराष्ट्रात असणे दुर्दैवी आहे. धागेदोरे लातूर, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगरशी जोडलेले आहेत. पुण्यातील काही शिक्षक, क्लासचालक, डॉक्टरांना अटक होण्याची शक्यता आहे. शिक्षक आणि डॉक्टर हे सेवाभावी, सन्मानाचे व्यवसाय. नीट पेपरफुटीने या दोन्ही क्षेत्रांचे अवमूल्यन चिंताजनक आहे. पेपरफुटीतून डॉक्टर झालेल्यांकडून रुग्णांवर योग्य उपचार होतील का? हा धोका आरक्षणापेक्षाही मोठा आहे. काही कोचिंग क्लासेस व एजंट पैशांच्या बदल्यात प्रश्नपत्रिका पुरवत असल्याने लाखो रुपये फी वसूल करर्णाया 'कोचिंग फॅक्टरी' संस्कृतीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. परीक्षा केंद्रांवर जाणे, राहणे, नवे नियोजन यामुळे पालकांवर आर्थिक भार पडला. रिफंड पोर्टल सुरू केले तरी प्रवासाचा व मानसिक त्रासाचा खर्च भरून निघणार नाही. 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'च्या विश्वासार्हतेला धक्का बसला आहे. त्यामुळे भविष्यात नीट पेन-कागदाऐवजी संगणकावर घेण्याचा विचार सुरू आहे.

या एका पेपरफुटीमुळे देशातील वैद्यकीय शिक्षण व्यवस्था व लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य अधांतरी झाले आहे. सीबीआय तपास करत असून दोषींवर कडक कारवाईची मागणी होत आहे. या गोंधळानंतर काही विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या दुर्दैवी घटना घडल्या. त्यांच्या मृत्यूला जबाबदार कोण? सरकारी यंत्रणा, शिक्षण विभाग, बाजारीकरण की अवैध मार्गाने यश मिळवण्यास प्रवृत्त करणारे पालक? हे प्रश्न अनुत्तरीत आहेत. या आत्महत्या खरंच आत्महत्या आहेत की ढिसाळ व्यवस्थेचे बळी? शिक्षणाचे अवैध बाजारीकरण वेळीच रोखायला हवे. कोणत्याही सदृढ समा

दूषित पाण्यातून पावसाळ्यात आणि एरवीही अनेक आजार पसरतात. विशेषतः पावसाळ्यामध्ये घरात अशुद्ध पाणी येण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे कावीळ, गॅस्ट्रो, कॉलरा, डायरिया असे आजार उद्भवतात. या आजारांपासून लांब राहण्यासाठी पाणी निर्जंतुक व स्वच्छ असणे गरजेचे आहे.

१. पाणी गाळून घेणे – वॉटर प्युरीफायरमध्ये पाणी गाळले जाते. त्याचप्रमाणे स्वच्छ कापड किंवा अतिशय बारीक जाळीची गाळणी यांनी पाणी गाळून घेतल्यास ते स्वच्छ होते. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात या पद्धतीचा हमखास वापर करावा. मी चागंल्या सोसायटीमध्ये राहतो त्यामुळे आमच्याकडे चांगले पाणी येते असे वाटत असले तरीही पाणी कायम गाळून मगच प्यावे.



२. उकळणे – पाण्याच्या दोन प्रकारच्या दुष्टीपासून आपण आपली काळजी घेतली पाहिजे. भौतिकदृष्ट्या पाणी दुष्ट होते ते म्हणजे कचरा, माती, गाळ इत्यादी आणि जीव-जंतूंनी पाणी दुष्ट होते. हा अतिशय धोकादायक प्रकार. भौतिक दुष्टी आपण पाणी गाळून, तुरटी फिरवून घालवू शकतो, पण जीव-जंतूंच्या दुष्टीमध्ये पाणी उकळून घेणे जास्त सोयीस्कर आहे. उकळल्यामुळे पाण्यातील जीवजंतू मरुन जातात आणि पाणी शुद्ध होते. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत कुटुंबातील सर्वांनी उकळलेले पाणी प्यावे.

३. तुरटी फिरवणे – तुरटी फिरवून पाणी शुद्ध करणे ही अतिशय पारंपरिक पद्धत आहे. भरलेल्या पाण्याच्या भांड्यात तुरटी फिरवल्यास पाण्यातील गाळ खाली बसतो आणि पाणी स्वच्छ होते. मात्र तुरटी फिरवली असली तरीही हा पाणी स्वच्छ करण्याचा म्हणावा तितका खात्रीशीर उपाय नसल्याने हे पाणी गाळून आणि उकळूनच प्यावे.

४. नळाला फडके किंवा फिल्टर बसविणे – पावसाळ्याच्या दिवसात नळाला काहीसे मातकट आणि अशुद्ध पाणी येते. त्यामुळे हे पाणी भरतानाच काही प्रमाणात स्वच्छ व्हावे यासाठी नळाला कापड बांधावे किंवा गाळणे लावावे. याशिवाय हल्ली बाजारात नळाला लावण्यात येणारी वेगवेगळी फिल्टर्स उपलब्ध असतात. त्यांचा वापरही फायदेशीर ठरु शकतो. यामुळे पाण्यातील सौम्य प्रकारच्या जंतूंचा धोका कमी होण्यास मदत होते.



डोळ्यात कचरा गेल्यावर करा हे उपाय डोळे हे मानवी शरीरातील एक महत्त्वाचे ज्ञानेंद्रिय. डोळे हा अतिशय महत्त्वाचा आणि नाजूक अवयव असल्यामुळे त्याकडे विशेष लक्ष द्यावं लागतं. धूळ, माती, प्रदुषके यांच्यामुळे डोळ्यांना इजा पोहचू शकते. वातावरणातील धुलीकण डोळ्यात गेल्यानंतर डोळ्यांची जळजळ होणे, त्यातून पाणी येणे, डोळ्यात खुपणे असे अनेक त्रास संभवतात. त्यामुळे घरातून बाहेर पडताना डोळ्याची विशेष काळजी घ्यावी लागते. अनेक वेळा प्रवासादरम्यान डोळ्यामध्ये माती किंवा कचरा जातो. अथक प्रयत्न केल्यानंतरही डोळ्यात गेलेला कचरा काढणं शक्य होत नाही. अशावेळी काही सोप्या पद्धतीने आपण डोळ्यात गेलेला कचरा काढू शकतो.

१. सुती कापड पाण्यामध्ये भिजवावे. या ओल्या कापडाने डोळ्यांच्या कडा हलक्याशा दाबाव्यात. फक्त हा दाब देत असताना डोळ्यामधील कोणत्याही जागेवर जोर पडणार नाही याकडे लक्ष द्यावे.

२. डोळ्यांवर गार पाणी शिंपडावे किंवा एका बशीत पाणी घेऊन १-२ सेकंदासाठी त्यात डोळा उघडझाप करावा. हे करत असतांना डोळ्यात पाणी जातं मात्र घाबरु नये.

३. अनेक वेळा पापण्यांवर धूळ साचते अशावेळी डोळ्याच्या वरच्या बाजूला असलेल्या पापण्या खालच्या पापण्यांवर ठेवाव्यात आणि डोळ्यांची हळूहळू उघडझाप करावी.

४. डोळ्यात धूळ गेल्यास डोळ्यावर हळूवार फुंकर मारावी.

५. डोळ्यात काही गेल्यावर त्या क्षणी डोळ्यांची उघडझाप करावी. जेवढ्या लवकर तुम्ही ही कृती कराल. तेवढा डोळ्यातील कचरा दूर होण्याची शक्यता जास्त असते.

तुम्हाला माहित आहे का? 'हे' आहेत 'मोसंबी'चे फायदे

मोसंबी हे फळ मूळचे भारतीय नव्हे. मोझांबिक बेटाचे नावावरून याला मोसंबी हे नाव पडले असले तरी याचे मूळ स्थान चीन आहे. या फळाचा रस चवीला मधुर, पाच्य (पचावयास हलका) पण कफकारक असला तरी शक्तिवर्धक, भूक व तृषाशामक आहे. थोडी मिरपूड व मीठ लावून घेण्याने कफाचा प्रादुर्भाव होत नाही. काही वेळेस रस कोमट करून घेण्याचा वैद्य सल्ला देतात. दीर्घ आजारात शक्ती भरून येण्यासाठी तसेच जेव्हा पचनयंत्रणा कमकुवत झालेली असते; अशावेळी या रसाचा सातत्याने उपयोग केला जातो.

- रस घेण्यामुळे पोटातील आम्लता दूर होते, भूक लागते व पचनाच्या तक्रारी दूर होतात.
- शरीरात कोणत्याही कारणाने रक्तदोष निर्माण झाला, तर काही दिवस तरी नियमाने रस घ्यावा.
- बस, ट्रेन, बोट लागण्याची सवय असल्यास प्रवासात अधूनमधून साल काढून कापटी चोखत राहावे; त्रास जाणवत नाही.
- मोसंबीची साल सावलीत वाळवून त्याची मडक्यात घालून राख करावी. उलटी होत असल्यास अर्धा चमचा राख मधातून उलटी थांबेपर्यंत १/१ तासाचे अंतराने चाटवावी.
- कफ प्रकृतीचे व्यक्तींना शक्तिवर्धक म्हणून रस घेणे असल्यास गरम करून, ग्लासभर रसात २ चमचे आल्याचा रस टाकून घ्यावा, कफाचा प्रादुर्भाव होत नाही.
- फुलांपासून मोसंबीचे सुवासाचा अर्क काढून अत्तर तयार करण्यासाठी वापरतात व याला खूप मागणी असते.



अॅक्युप्रेशर थेरपी घेतल्याने दूर होऊ शकतो तणाव



शारीरिक आणि मानिसक समस्यांपासून दिलासा देण्यात अॅक्युप्रेशर थेरेपीही खूप फायद्याची आहे. मात्र, शरीराच्या योग्य सांध्यावर अॅक्युप्रेशर केले तरच लाभ मिळते. जाणून घेऊया तणाव दूर करण्यासाठी शरीराचे अॅक्युप्रेशर बिंदू-

खांदे आणि मानेचा मिलन बिंदू

दिवसभराचा संपूर्ण तणाव खांदे आणि मानेच्या स्नायुंमध्ये एकत्र होतो. खांदे आणि मानेच्या मिलनी बंदुवर प्रेशर बनवल्यास यापासून आराम मिळू शकतो. कार्यालयात डेस्कवर बसल्या-बसल्या थोडे मागच्या बाजूने झुका आणि दोन बोटांनी जिथे मान कवटीला मिळते त्या जागेची २० सेकंदांपर्यंत मसाज करा. यामुळे रिलेक्स वाटते.

अमाशय- अमाशय नाभीच्या वर असते. अनेक रिफ्लेक्सोलॉजिस्ट या बिंदूचा वापर करणे पसंत करतात. इथे अॅक्युप्रेशरद्वारे होणारी हालचाल छाती आणि डायफ्रामला तणावापासून मुक्त करते. यामुळे श्वास घेण्याची प्रक्रिया सुधारते.

पाय - मेंदूला आराम मिळवून देण्यासाठी हा बिंदू एकदम योग्य आहे. असे मानले जाते की, अग्नाशय (पॅनक्रियाज) बरे करण्यासाठी हा सर्वात चांगला अॅक्युप्रेशर पॉइंट आहे. पायाच्या अगदी मध्यभागी असलेला हा पॉइंट तणाव कमी करतो आणि शरीराच्या क्रियांवर लक्ष देण्यामध्ये व्यक्तीची मदत करतो.

हात - हातांवर दाब देताच तणावापासून आराम मिळतो. हा महत्त्वपूर्ण ऊर्जा चॅनेलपैकी एक आहे. हा बिंदू हृदय, यकृत, अग्नाशयाला प्रभावित करतो. ज्या लोकांना तणाव जाणवतो त्यांच्यामध्ये बहुतांश यकृतामध्ये एकत्र होतो. हा भाग दाबल्याने खूप आराम मिळतो.

दंड - रिफ्लेक्सोलॉजी आणि अॅक्युपंक्चरसाठी हा बिंदू शरीराच्या उत्तम स्पॉट्सपैकी एक मानला जातो. तणाव आणि थकवा शरीरामध्ये उलटा ऊर्जा प्रवाह तयार करतात. अशा स्थितीमध्ये अॅक्युप्रेशर थेरपी अत्यंत उपयुक्त ठरते. यामुळे ऊजेर्चा प्रवाह सुधारतो. तसेच ऊर्जा योग्य दिशेने घेऊन जाण्यासोबतच ही थेरपी मानसिक एकाग्रतादेखील वाढवते. या बिंदूवर अॅक्युप्रेशर केल्याने तणाव गायब होतो.

लक्षण दिसली तर वेळीच सावध व्हा

कारण असू शकतात 'हे' लिव्हर खराब होण्याचे संकेत



शरीराचं कार्य सुरळीत व्हावं यासाठी अनेक अवयव महत्त्वाची भूमिका बजावतात. अशातच लिव्हर शरीराचा एक महत्त्वपूर्ण भाग असून त्याला यकृत असंही म्हटलं जातं. जर लिव्हरचं आरोग्य बिघडलं तर मृत्यू होण्याचाही धोका संभवतो. लिव्हरचं काम पचनक्रियेशी निगडीतही असतं. लिव्हरचं वजन १.३ ते १.६ किलोग्राम एवढं असतं. लिव्हर शरीरातील विषारी घटक पित्ताच्या स्वरूपात फिल्टर करण्याचं काम करतं आणि मल किंवा मूत्र स्वरूपात शरीरातून बाहेर टाकले जातात. लिव्हर शरीरामध्ये जवळपास ३०० पेक्षा अधिक कामं करतं. लिव्हर रक्तामध्ये साखरेचं प्रमाण नियंत्रणात करण्याचं काम करतो. लिव्हरचं एक कार्य शरीरात रक्त तयार करणं हेदेखील आहे.

त्वचेचा रंग पिवळा होणं

लिव्हरचं काम बिघडतं तेव्हा याचा परिणाम त्वचेवर दिसून येतो. तसेच डोळ्यांमध्येही पिवळेपणा वाढतो. त्वचेचा रंग पिवळा पडणं, लघवीचा रंग पिवळा होणं यांसारखी लक्षणं दिसून आली तर वेळीच सावध व्हा.

उलटीमधून रक्त पडणं

जेव्हा सतत मळमळ होणं किंवा उलट्या येणं यांसारख्या समस्या वाढतात. त्यावेळी लिव्हरची समस्या असण्याती शक्यता असते. तसेच उलटी करताना त्यातून रक्त पडलं तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. तज्ञांचा सल्ला घ्या.

हाता पायांना सूज येणं

लिव्हरचं आरोग्य बिघडतं त्यावेळी पोटाच्या खालच्या बाजूला सूज जाणवू लागते. तसेच हाता-पायांनाही सूज येते. जर तुम्हालाही ही समस्या जाणवत असेल तर दुर्लक्ष न करता डॉक्टरांचा सल्ला घेणं आवश्यक असतं.

थकवा जाणवणं

अनेकदा आपल्याला थकवा येत असेल तर हेदेखील लिव्हर खराब होण्याचे संकेत असू शकतात. थकवा येण्याची इतरही कारण असू शकतात. त्यामुळे योग्य कारण ओळखण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

जेवण बेचव लागत असेल तर

जेवणाची इच्छा होत नसेल किंवा चव लागत नसेल तर ही गंभीर समस्या असू शकते. तसेच तोंडातून दुर्गंधी येत असेल तर हेदेखील लिव्हर खराब होण्याचं लक्षण असू शकतं.

'कैरीचे सार'



साहीत्य :

- १ मोठी कैरी
- गूळ (टीप)
- १ टिस्पून तूप
- १/४ टिस्पून जिरे
- २ चिमूटभर हिंग
- ३ ते ४ कढीपत्ता पाने
- २ हिरव्या मिरच्या, ठेचून घ्याव्यात
- १/४ कप कोथिंबीर
- चवीपुरते मिठ

कृती:

- कैरी कूकरमध्ये २ शिट्ट्या करून वाफवून घ्यावी. कूकरची वाफ जिरल्यावर वाफवलेली कैरी बाहेर काढून कोमटसर असतानाच सोलून घ्यावी. नंतर आतील गर घट्ट असेल तर किसून घ्यावा.
- जेवढा गर असेल तेवढा गूळ घालावा (किंचीत कमी चालेल). हे मिश्रण मिक्सरमध्ये बारीक करावे. कैरीच्या गराला दोरे असतील तर गर गाळून घ्यावा.
- कढईत तूप, जिरे, हिंग, कढीपत्ता आणि मिरचीचा ठेचा घालून फोडणी करावी. त्यामध्ये कैरीचा गर घालून गरजेइतपत पाणी घालावे. मिठ घालून उकळी काढावी.
- उकळी काढून झाल्यावर चिरलेली कोथिंबीर घालून गरमागरम सर्व्ह करावे.
- हे कैरीचे सार गरमागरम तूप-भाताबरोबर छान लागते. तसेच नुसते प्यायलाही मस्तच!!

टीप:


- कैरीला आंबटपणा कमी असेल तर गूळाचे प्रमाण कमी करावे.

नखं वाढवण्यासाठी खास घरगुती उपाय

नखांचे सौंदर्य वाढवणे म्हणजे केवळ नेल आर्ट करणे नव्हे तर, आपल्या नखांना नैसर्गिकरित्या पोषण देऊन त्यांचे रूप खुलवणे होय. तुम्हाला नेल आर्ट करून तुमच्या नखांचे सौंदर्य वाढवायचे असेल तर आधी त्यांना उत्तम पोषण मिळणे आवश्यक असते. त्यासाठी नखांची काळजी घेणे तितकेच गरजेचे असते. हातांची बोटं सुंदर दिसावी म्हणून बरेचदा स्त्रिया नखे वाढवताना दिसतात. मात्र, नखांची नीट काळजी घेतली नाही तर ती तुटतात. मात्र, जर लांब आणि सुंदर नख हवी असल्यास काही घरगुती उपाय केल्यास नख लांब आणि सुंदर होण्यास मदत होते.

- नारळाचे तेल तुमची केवळ त्वचा आणि केसच नाही तर नखांसाठीदेखील फायदेशीर असते. त्यासाठी नारळाच्या तेलामध्ये थोडेसे मध आणि ४ थेंब रोझमेरी तेल घालून मिक्स करावे. हे मिश्रण थोडे गरम करून घ्यावे. त्यानंतर नखे १५ ते २० मिनिटे तेलामध्ये बुडवून बसावे. आठवड्यातून असे २ वेळा केल्यास, नख वेगाने वाढतात आणि मजबूतही होतात.
- दूध आणि अंडं हे दोन्ही पदार्थ हाडे मजबूत करतात. त्यामुळे याचं सेवन करणं शरीरासाठी फायदेशीर असतं. तसेच नखांची मजबूती वाढवण्यासाठी देखील याचा वापर केला जातो. यासाठी तुम्हाला केवळ एका अंड्याचा सफेद भाग दुधामध्ये घालून फेटायचं आहे आणि यामध्ये ५ मिनिट्स तुमची नखं बुडवून ठेवा, असं केल्यामुळे तुमच्या नखांना मजबूती मिळेल आणि वेगाने नखं वाढतील.
- लसणाचा वापर केवळ खाण्यासाठीच नाही तर नखांचं पोषण आणि वाढीसाठीदेखील होऊ शकतो. लसणाची पेस्ट आठवड्यातून दोन वेळा नखांवर लावल्यामुळे नखांना आवश्यक असणारं पोषण मिळतं.
- नखं वाढण्यासाठी विटामिन सी खूपच फायदेशीर असतं. संत्र्यामध्ये विटामिन सी चं प्रमाण जास्त प्रमाणात असतं. त्यासाठी तुम्ही ताज्या संत्र्याच्या रसामध्ये कमीत कमी १० मिनिट्स नखं बुडवून ठेवावी. त्यानंतर अगदी हलक्या गरम पाण्याने नखं धुऊन त्यावर मॉईस्चरायजर लावावे.
- १ चमचा लिंबू रसामध्ये ३ चमचे ऑलिव्ह ऑईल घालून थोडं गरम करून घ्यावं. त्यानंतर १० मिनिट्स नखं यामध्ये बुडवून ठेवावीत. तुम्ही रोज जरी हे करू शकत असाल तर लिंबाचे तुकडे नखांवर घासावेत. असं केल्यास, नखं पटकन वाढतात.






झोपण्यापूर्वी अशी घ्या केसांची काळजी

लांब आणि चमकदार केसांसाठी त्यांची व्यवस्थित काळजी घेणं गरजेचं आहे. जर तुमचे केस ऑईली, ड्राय ,कलर केलेले अथवा फ्रिझी असतील तर तुम्हाला केसांची विशेष निगा राखावी लागते कारण असे केस लवकर खराब होतात. केसांवर नियमित तेल लावणे, हेअर मास्क, हेअर सिरम वापरणे, वेळच्या वेळी हेअर स्पा करणे, वारंवार कर्लर अथवा स्टेटनर न वापरणे अशा अनेक गोष्टींचा हेअर केअरमध्ये समावेश होतो. मात्र या सर्व गोष्टींप्रमाणेच तुम्ही दररोज केसांची काळजी कशी घेता हेदेखील फार महत्त्वाचे ठरते. साधं आणि सोपं उदाहरण घ्यायचं झाल्यास तुम्ही रात्री झोपण्यापूर्वी केसांची कशी काळजी घेता यावर तुमच्या केसांचे आरोग्य अवलंबून आहे. दररोज रात्री झोपताना काही गोष्टींबाबत दक्षता घेत तुम्ही तुमच्या केसांची निगा राखू शकता. यासाठी जाणून घ्या रात्री झोपण्यापूर्वी केसांची कशी काळजी घ्याल.





रात्री झोपण्यापूर्वी केस धुवू नका

केस जेव्हा ओले असतात तेव्हा ते तुटण्याची शक्यता अधिक असते. यासाठी शक्य असल्यास रात्री झोपण्यापूर्वी केस कधीच धुवू नका. मात्र जर तुम्हाला दुसऱ्या दिवशी लवकर घराबाहेर जायचे असेल तर केस आदल्या दिवशी रात्री धुवावेच लागतात. असं करावं लागल्यास केस धुतल्यावर ते व्यवस्थित कोरडे केल्याशिवाय झोपू नका. मात्र केस कोरडे करण्यासाठी ड्रायरचा वापर करू नका. त्याऐवजी अंघोळ केल्यावर केसांवर टॉवेल गुंडाळून ठेवा ज्यामुळे केसांमधील पाणी टॉवेल शोषून घेईल आणि तुमचे केस लवकर कोरडे होऊ शकतील.

केस घट्ट बांधून झोपू नका

काही जणींना केस मोकळे सोडून तर काही जणींना केस घट्ट बांधून झोपायची सवय असते. जर तुम्हाला केस मोकळे ठेवायची सवय असेल तर झोपेत केस अंगाखाली येवून तुटू शकतात. शिवाय केस घट्ट बांधून ठेवले तरी येणाऱ्या ताणामुळे केसांचे नुकसान होऊ शकते. यासाठी रात्री झोपण्यापूर्वी अगदी सैलसर पोनीटेल अथवा वेणी घालून मगच झोपा. ज्यामुळे तुमच्या केसांचे नुकसान होणार नाही.

झोपण्यापूर्वी केस विंचरा

सकाळी उठल्यावर कॉलेज अथवा ऑफिसला जाण्याची घाई सर्वांना असते. मात्र बऱ्याचदा या घाईत लांब केसांचा गुंता सोडवणे कठीण जाते. केसांचा गुंता सकाळी सोडवण्यासाठी वेळ मिळत नसेल तर हा उपाय जरूर करा. रात्री झोपण्यापूर्वी केस विंचरून गुंता सोडवून घ्या. केसांची सैलसर वेणी अथवा पोनी टेल बांधून झोपी जा. सकाळी उठल्यावर तुमच्या केसांमधील गुंता नक्कीच कमी झालेला असेल.

हेअर बॅन्ड निवडताना काळजी घ्या

केस व्यवस्थित बांधले जावेत यासाठी अनेकींना केस घट्ट इलॅस्टिक बॅन्डने पोनीटेल बांधायची सवय असते. मात्र अशा इलेस्टिक बॅन्डमुळे तुमचे केस लवकर तुटू शकतात. यासाठीच बाजारात अनेक सॉफ्ट मटेरिअलपासून तयार केलेले बॅन्ड मिळतात. सॉफ्ट बॅन्डमुळे तुमच्या केसांचं नुकसान कमी होऊ शकतं. हे सॉफ्ट बॅन्ड सॅटिन, सिल्क, कॉटन अथवा मायक्रोफायबर पासून तयार केलेले असतात. मात्र हा बॅन्ड फार घट्ट बांधू नका रात्री झोपताना अशा बॅन्डने केस सैलसर बांधूनच झोपा.

झोपण्यापूर्वी केसांवर तेल अथवा सिरम लावा

तेलामुळे केसांचे संरक्षण आणि पोषण होत असते. यासाठीच केसांना वेळच्यावेळी तेल अथवा सिरम लावणं फार गरजेचं असतं. दिवसभर कामानिमित्त घराबाहेर असल्यामुळे तुम्ही केसांना तेल लावणं टाळता. मात्र रात्री झोपताना केसांना तेल लावण्यास काहीच हरकत नसते. ज्यामुळे तुमच्या केसांचे आरोग्य चांगले राहू शकते. यासाठी रात्री झोपण्यापूर्वी केसांना नाराळाचे तेल, ऑलिव्ह ऑईल, बदामाचे तेल अथवा जास्मिन तेल लावा आणि बोटांनी केसांना मसाज करून केस बांधून ठेवा.

सॅटिनची बेडशीट आणि पिलो कव्हर वापरा

सॅटिनची बेडशीट आणि सॅटिनचे पिलो कव्हर हे तुमच्या बेडरूमला एक छान आणि रॉयल लुक देतात. मात्र त्याचसोबत अशा बेडशीट आणि पिलो कव्हर तुमच्या केसांच्या आरोग्यासाठीदेखील उत्तम असतात. कारण सॅटिनमुळे तुमच्या केसांमधील नैसर्गिक ओलावा आणि आर्द्रता शोषून घेत नाही. ज्यामुळे तुम्ही केसांवर लावलेलं तेल, सिरम निघून जात नाही. तेल आणि सिरम तुमच्या केसांचं संरक्षण करतं. शिवाय कॉटनपेक्षा सॅटिनचा स्पर्श अगदी मऊ आणि मुलायम असतो. ज्यामुळे तुमचे केस तुटण्याची शक्यता फारच कमी असते.

भारतात खाद्यसंस्कृतीची विविधता इतकी आहे की, दर दहा मैलावर खाद्यपदार्थ आणि त्याची चव बदलते. इतकी विविधता ही दुसऱ्या कोणत्या देशात क्वचितच असेल. पण भारतात एक गोष्ट सामाईक आहे, ती म्हणजे स्वयंपाकघरात बनणाऱ्या पदार्थ सेवनात तिचे स्थान दुय्यम असते. जरी ती जेवण बनवत असली तरी भारतातील शहरी व ग्रामीण भागात ७० टक्के स्त्रिया या कुपोषित आहेत किंवा त्यांच्यात ॲनिमियाचे प्रमाण हे सर्वात जास्त दिसून येते. याचं कारणं म्हणजे खाण्यापिण्याच्या बाबतीत स्त्रिया या नेहमी स्वतःकडे दुर्लक्ष करतात. या दुर्लक्ष करण्यामागे महत्त्वाचे कारण आहे, ते म्हणजे स्त्रियांच्या आहाराबद्दल असलेली मानसिकता. त्यामुळे स्त्रियांनी आता एक खूणगाठ बांधली पाहिजे की आपल्या आहाराची आणि शरिराची काळजी आपणच घ्यायची आणि ही काळजी घेत असताना कोणतीही अपराधीपणाची भावना मनात येता कामा नये. इतकं केलं तरी खूप महत्त्वाचं पाऊल असेल. आपल्याला दिवसभर काम करावं लागतं, कुटुंबाची काळजी घ्यावी लागते यासाठी काय-काय खावे आणि काय टाळावे हे जाणून घेणं खूप गरजेचं आहे. अनेक स्त्रिया या घरकामात इतक्या गुंतून जातात की त्यांची खाण्यापिण्याची काही वेळ ठरलेली नसते किंवा आहाराबद्दल नियोजन नसते. त्यामुळे सकाळी नाष्टा करणे आणि त्यात केळी, राजगिऱ्याचे लाडू, भाताची पेज, रव्याची खीर या पदार्थांचा समावेश असणे गरजेचे आहे या पदार्थांमुळे शरीराला ऊर्जा मिळते. दिवसाची सुरुवात पोषणयुक्त आहाराने होते. नाष्टा आणि दुपारचे जेवण यामध्ये खूप तासांचे अंतर ठेवू नये. मधल्या वेळेत भाजलेले फुटाणे, शेंगदाणे, लाह्या असे हलके पदार्थ खाऊ शकता. जेवणात रोज एकाच प्रकारचे पदार्थ न खाता गव्हाची चपाती, नाचणीची भाकरी, ज्वारीची भाकरी, पालेभाज्या, पराठे, कडधान्य, थालीपीठं असे पदार्थ आलटूनपालटून खावेत. तसेच मांसाहाराचा समावेशदेखील जेवणात असलाच पाहिजे. चौरस आहार घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण बदलत्या जीवनशैलीमुळे आपल्या आहारात बेकरीचे पदार्थ, पॅकबंद पदार्थ, बाटलीबंद पदार्थ, सॉस यांचा स्वयंपाकघरात व आहारात कमीत कमी समावेश असावा. स्त्रिया नेहमीच अन्न वाया जायला नको म्हणून शिळं खातात. अनेक वेळा ज्यादा झालेलं अन्न फ्रिजमध्ये ठेवून दोन ते तीन दिवस खातात. एखाद्यावेळी शिळं खाणं ठीक आहे, पण रोज शिळं कधीच खाऊ नये. त्यामुळे जेवण बनवतानाच ते गरजेनुसार बनवा. स्वयंपाकघरात प्लास्टिकचा वापर, स्टीलच्या भांड्यात जेवण बनवणे, फ्रिजचा जास्त वापर या गोष्टी टाळाव्यात. स्त्रियांनी घरात जेवताना सर्वांसोबत जेवावं, मन लावून जेवण करावं. घरच्या बाईकडे सर्व घराला खाऊ घालण्याची जबाबदारी असते. अनेक बायका या घरचे सगळे व्यवस्थित जेवले यातच समाधान मानतात. स्वतःकडे दुर्लक्ष करतात. खरं तर बाई ही प्रत्येक कुटुंबाचा आधार असते. त्यामुळे हा आधार सुदृढ राहण्यासाठी कुटुंबातील प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

नीट प्रकरणात मोठी कारवाई, शिक्षक आणि पालक दोघांना अटक

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

सीबीआयने नीट प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. पुण्यातून दोन जणांना अटक करण्यात आली आहे. एक शिक्षक आणि एक पालक अशा दोघांना अटक करण्यात आली आहे. या दोघांपैकी एकाचा मनिषा हवालदार आणि दुसऱ्याचा मोटेगावकरांशी संबंध असल्याची माहिती पुढे आली आहे. या अटकेमुळे मोठे धागेदोरे हाती येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकरणात अजून कोण कोण आहे? याची कसून चौकशी या दोघांकडून केली जाणार असून पेपरफुटीत या दोघांचा किती सहभाग होता याचाही तपास केला जाणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

सीबीआयने पुण्यातून तेजस शाह नावाच्या फिजीक्सच्या शिक्षकाला अटक केली आहे. त्याच्या मोबाईलमध्ये गॉड नावाने नंबर सेव्ह होता. शिवाय मनिषा हवालदारकडून त्याने पेपर घेतल्याची माहिती आहे. तो मनिषा हवालदारच्या संपर्कात होता. त्यामुळेच सीबीआयने त्याला अटक केली असून आता त्याची कसून चौकशी केली जाणार आहे. टेलिग्राम ग्रुपमध्येही तो होता का? याचीही माहिती घेतली जाणार आहे. तसेच पेपर फोडल्यानंतर त्याने त्यातून आर्थिक कमाई केली का? याचाही शोध घेण्यात येणार आहे. त्याचं बँक अकाऊंटही तपासलं जाणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

मोठे धागेदोरे हाती येणार?



दोन नव्या विद्यार्थ्यांची चौकशी

दरम्यान, सीबीआयने डॉ. मनोज शिरूरे यालाही अटक केली आहे. त्याचा मोटेगावकराशी थेट संबंध असल्याचं सांगितलं जात आहे. तसेच नीट पेपर फुटी प्रकरणात लातूर मध्ये सीबीआयच्या पथकाकडून चौकशी सुरूच आहे. नव्याने दोन विद्यार्थ्याची चौकशी करण्यात आल्याची माहिती समोर येते आहे. आता पर्यंत पाच डॉक्टर आणि चार विद्यार्थी, पालकांची चौकशी करण्यात आली आहे. नीट पेपर फुटी प्रकरणाशी धागेदोरे कसून तपासले जात आहेत.

मोटेगावकर बोलला

नीट परीक्षेच्या अगोदरच पेपर मिळाल्याची कबुली शिवराज मोटेगावकर याने सीबीआयला दिल्याची माहिती आहे. सीबीआयच्या चौकशीत मोटेगावकरने त्याच्या मुलाला नीट परीक्षेच्या अगोदरच पेपर मिळाल्याची कबुली दिल्याची माहिती कळते आहे. सीबीआयने अधिकृतरित्या ही माहिती दिलेली नसली तरी मोटेगावकर याने मुलाला डॉक्टर करण्यासाठी पेपर विकत घेतल्याचे समोर आले आहे. मोटेगावकरला 10 दिवसांची पोलिस कोठडी मिळालेली होती. या दरम्यान झालेल्या चौकशीत मोटेगावकरने नीट परीक्षेच्या अगोदरच पेपर मिळाल्याचे कबूल केले असल्याचे कळते आहे.

बांधकाम पाडणार


दरम्यान, लातूर महानगर पालिकेने मोटेगावकरला दिलेला बांधकाम परवाना वादात सापडला आहे. औद्योगिक सहकारी संस्थेची जागा मोटेगावकरच्या नावावर नसताना देखील बांधकाम परवाना दिला गेल्याचे समोर आले आहे. त्यावर आता आमदार अमित देशमुख यांनी मनपा कठोर कार्यवाही करेल अस म्हटले आहे. कायद्याच्या चौकटीत राहूनच लातूर महानगर पालिकेत कारभार केला जाईल. कायदा बाहेर जाऊन कोणी काम करीत असेल तर त्याच्यावर कार्यवाही होईल अस अमित देशमुख यांनी म्हटलं आहे. ते लातूर

१० ते १२ लाखांत विकला जात होता पेपर

लातूर : देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील धागेदोरे आता लातूरमध्ये अधिकच मजबूत होताना दिसत आहेत. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी केंद्रीय अन्वेषण विभागाचे पथक गेल्या अनेक दिवसांपासून लातूरमध्ये तळ ठोकून आहे. मंगळवारी सीबीआयने या प्रकरणाशी संबंधित आणखी एका डॉक्टरची चौकशी केली. यासोबतच शिवराज मोटेगावकर आणि पी. व्ही. कुलकर्णी यांच्या बॅचमध्ये शिकलेल्या विद्यार्थ्यांचीही चौकशी करण्यात येत आहे. या तपासादरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर येत आहेत. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आरसीसी क्लासेसचा संचालक शिवराज मोटेगावकर आणि एनटीएमधील केमिस्ट्री विषयाचा पेपर सेटर पी. व्ही. कुलकर्णी यांनी ठएएळ परीक्षेचा पेपर विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना लाखो रुपयांत विकल्याचा आरोप आहे. सीबीआयच्या हाती लागलेल्या आर्थिक व्यवहारांच्या नोंदींमधून अनेक पालकांनी मोटेगावकर आणि कुलकर्णी यांच्या खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रक्कम हस्तांतरित केल्याचे स्पष्ट झाले आहे. या व्यवहारांचे डिजिटल पुरावे तपास यंत्रणेकडे उपलब्ध झाले आहेत. सीबीआयच्या प्राथमिक तपासात पी. व्ही. कुलकर्णी आणि शिवराज मोटेगावकर यांनी मिळून ठएएळ परीक्षेचा पेपर तब्बल १०ते १२ लाख रुपयांना विकल्याचा धक्कादायक खुलासा झाला आहे. या व्यवहारांशी संबंधित ऑनलाईन ट्रान्झॅक्शनचे भक्कम पुरावे तपास यंत्रणेला मिळाले आहेत. विशेष म्हणजे, ज्यांनी हा पेपर खरेदी केला त्या काही पालकांनी पुढे आपल्या नातेवाईकांना आणि परिचितांना २ ते १० लाख रुपयांच्या मोबदल्यात तोच पेपर विकल्याची माहितीही समोर आली आहे. तपासात शहरातील काही नामांकित डॉक्टरांनी आपल्या मित्रांच्या आणि जवळच्या व्यक्तींच्या मुलांपर्यंत हा पेपर पोहोचवल्याचेही उघड झाले आहे.

ऑनलाईन व्यवहारांमुळे आरोपी अडचणीत : या संपूर्ण प्रकरणात डिजिटल व्यवहार आरोपींसाठी मोठी अडचण ठरत आहेत. अनेक पालकांनी पेपर खरेदीसाठी लागणारी रक्कम थेट ऑनलाईन पद्धतीने ट्रान्सफर केली होती. त्यामुळे प्रत्येक व्यवहाराची नोंद उपलब्ध असून सीबीआयला तपासासाठी महत्त्वाचे पुरावे मिळाले आहेत. काही पालकांनी आपल्या पत्नींच्या किंवा मुलांच्या बँक खात्यांमधून थेट प्रा. कुलकर्णी आणि शिवराज मोटेगावकर यांच्या खात्यावर पैसे पाठवले होते. या सर्व आर्थिक व्यवहारांची सध्या सखोल पडताळणी सुरू आहे. दरम्यान, लातूर शहरातील नामांकित रुग्णालयांशी संबंधित पाच डॉक्टरांची सीबीआयने चौकशी केली आहे. यापैकी चार डॉक्टरांच्या मुलांनी यंदाची नीट परीक्षा दिली होती. स्वतःचा वैद्यकीय व्यवसाय पुढे चालवण्यासाठी आपल्या मुलांनी डॉक्टर व्हावे, या इच्छेपोटी काही डॉक्टरांनी पेपर खरेदी केला असावा, असा संशय तपास यंत्रणेला आहे.

समृद्धी महामार्गावर बर्निंग कारचा थरार
टाटा नेक्सन ईव्ही कार जळून खाक



■मुंबई। प्रतिनिधी,

समृद्धी महामार्गावर बर्निंग कारचा थरार पहायला मिळाला आहे. सिन्नरहून शिर्डीकडे जाणाऱ्या टाटा नेक्सन इव्ही कारला अचानक आग लागल्याची घटना घडली. आज (बुधवारी) दुपारी दोन वाजेच्या सुमारास कांदळवाडी शिवाराजवळ ही आगीची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र क्षणांतच संपूर्ण कारने पेट घेतल्याने वाहन पूर्णतः जळून खाक झाले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, विजय गणेश गीते आणि योगेश प्रकाश घुगे हे दोघे सिन्नरहून शिर्डीकडे जात असताना त्यांच्या एमएच १५ एचवाय ५५६३ या क्रमांकांच्या टाटा नेक्सन ईव्ही कारमधून अचानक धूर निघण्यास सुरुवात झाली. प्रसंगावधान राखत दोघेही तात्काळ बाहेर पडले. यानंतर काही क्षणांतच वाहनाला भीषण आग लागली. दोघांच्याही प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला. आग इतकी भीषण होती की काही वेळातच संपूर्ण वाहन आगीच्या भक्ष्यस्थानी पडले आणि कार पूर्णपणे जळून खाक झाली.

दरम्यान, घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलीस प्रशासन व महामार्ग प्रशासन तब्बल एक तास उशिराने घटनास्थळी पोहोचले. या घटनेमुळे काही काळ समृद्धी महामार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला होता. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, संबंधित यंत्रणांकडून पुढील तपास सुरू आहे.

म्हाडाकडे घरबसल्या करता येणार तक्रार
सीएफसी@होम, व्हिजिटर मॅनेजमेंट सिस्टीमचे अनावरण

■मुंबई। प्रतिनिधी,

'सीएफसी @ होम' आणि 'व्हिजिटर मॅनेजमेंट सिस्टीम' या नागरीकाभिमुख संगणकीय प्रणालींचे म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. त्यानुसार मुंबईकरांना म्हाडाकडे घरबसल्या तक्रार करता येणार आहे.

म्हाडा मुख्यालयात आयोजित 'गो लाइव्ह' कार्यक्रमात नागरिकांसाठी या दोन्ही प्रणाली आजपासून कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. सरकारच्या जीपीआर २.० धोरणानुसार पारंपरिक कार्यालयीन प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक, वेगवान करून त्या डिजिटल



माध्यमातून उपलब्ध करून देण्याच्या दिशेने म्हाडाने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे.

वेळेची बचत, ऑनलाइन पाठपुरावाही

दोन्ही प्रणालीनुसार घरबसल्या अथवा कुठूनही अर्ज, तक्रारी तसेच इतर कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करून म्हाडाकडे पाठवता येणार आहेत. हे सर्व डिजिटल माध्यमातून करता येणार असून शुल्क भरणा व माहितीही उपलब्ध होणार आहे. यामुळे पाठपुरावा करता येणार लोकांच्या वेळेची बचत होणार आहे.

मध्य रेल्वेकडून दरवाढीचा प्रस्ताव रद्द... रेल्वे स्टॉलवरील वडा पाव-समोसा जुन्याच किंमतीत मिळणार

■मुंबई। प्रतिनिधी,

रेल्वेने दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा देत मध्य रेल्वेने स्टेशनवरील खाद्यपदार्थांच्या दरवाढीचा प्रस्ताव मागे घेतला आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर या निर्णयावर टीका होत असतानाच रेल्वे प्रशासनाने हा प्रस्ताव स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

रेल्वे अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील आदेश येईपर्यंत जुन्याच दराने खाद्यपदार्थांची विक्री सुरू राहणार आहे. त्यामुळे वडा पाव आणि समोसा या लोकप्रिय पदार्थांच्या प्रस्तावित दरवाढीला तात्पुरती स्थगिती मिळाली आहे. ही दरवाढ १ जूनपासून लागू होणार होती.

प्रस्तावानुसार वडा पावची किंमत १३ रुपयांवरून थेट २० रुपये करण्यात येणार होती, तर समोसा १२ रुपयांवरून २० रुपये करण्याचा प्रस्ताव होता.



प्रस्तावात पुढीलप्रमाणे दर ठेवण्यात आले होते-

- वडापाव : १३ रुपये ते २० रुपये
- सामोसा : १२ रुपये ते २० रुपये
- रगडा पाव : २० रुपये ते २५ रुपये
- पाव : ३ रुपये ते ५ रुपये
- एक पावसह रगडा/उसळ : २० रुपये ते २५ रुपये
- सुकी भेळ : २० रुपये ते २५ रुपये
- चटणी भेळ : २५ रुपये ते ३० रुपये

याशिवाय रगडा पाव, भेळ आणि पावावर आधारित इतर पदार्थांच्याही किंमती वाढवण्याचा प्रस्ताव होता.

ज्यूस आणि सोडा उत्पादनांचे दर

अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, ज्यूस किंवा सोडा-आधारित उत्पादनांच्या दरात कोणतीही वाढ प्रस्तावित करण्यात आली नव्हती.

मुंबई आणि परिसरातील प्रवाशांवर वाढत्या महागाईचा परिणाम होत असताना प्रवासाशी संबंधित खर्च वाढण्याबाबत चिंता व्यक्त केली जात होती. त्याच पार्श्वभूमीवर हा निर्णय मागे घेण्यात आला आहे.

पश्चिम रेल्वेच्या धर्तीवर दरवाढीची तयारी

रेल्वे अधिकाऱ्यांनी यापूर्वी सांगितले होते की, पश्चिम रेल्वेच्या धर्तीवर ही दरवाढ लागू करण्यात येत होती. पश्चिम रेल्वेने २०२१ नंतर २०२५ मध्ये खाद्यपदार्थांच्या दरांमध्ये बदल केला होता.

सुधारित मेनूमध्ये डोसा, नूडल्स, सूप, स्लश ड्रिंक्स आणि क्रीम भरलेले डोनट्स यांसारखे नवीन पदार्थही स्टेशनवरील स्टॉलवर उपलब्ध करण्याचा प्रस्ताव होता. मात्र, या निर्णयावर केटरिंग संघटना आणि प्रवासी संघटनांकडून तीव्र आक्षेप घेण्यात आले.

केटरिंग संघटना आणि प्रवासी संघटनांकडून विरोध

केटरिंग संघटनेच्या एका प्रतिनिधीने आरोप केला की, रेल्वे प्रशासन स्वस्त दरातील स्थानिक सुटे खाद्यपदार्थ जसे की चणे, शेंगदाणे, चिक्की आणि मिल्कशेक यांच्या विक्रीला मयार्दा आणत असून त्याऐवजी ब्रँडेड पॅकेज्ड पदार्थांना प्राधान्य दिलं जात आहे.

त्यांच्या मते, ब्रँडेड पदार्थ अनेकदा महाग असतात आणि स्थानिक पदार्थांच्या तुलनेत नेहमीच अधिक दजेर्दार किंवा अधिक प्रमाणात असतीलच असं नाही.

प्रवासी संघटनांनीही इशारा दिला होता की, स्टेशनवरील खाद्यपदार्थांच्या किंमती वाढल्यास त्याचा सर्वाधिक फटका कमी उत्पन्न गटातील प्रवाशांना बसू शकतो. मुंबईच्या उपनगरीय रेल्वे सेवेत अशा प्रवाशांची संख्या मोठी आहे.

सध्या जुन्याच दरात खाद्यपदार्थ उपलब्ध

सध्या तरी मध्य रेल्वेच्या स्टेशनवर प्रवाशांना जुन्याच दरात खाद्यपदार्थ खरेदी करता येणार आहेत. पुढील अधिकृत घोषणा होईपर्यंत हेच दर लागू राहणार असल्याचं रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केलं आहे.

'आंबा कॅनिंग'ला युद्धाचा फटका... दर कोसळले, परदेशातील मागणी घटली, बागायतदारांचे दुहेरी नुकसान

■सिंधुदुर्ग। प्रतिनिधी,

आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीचा फटका आता कोकणातल्या आंबा प्रक्रिया उद्योगालाही बसला असून परदेशातील मागणी घटल्याने 'कॅनिंग' कंपन्यांनी यंदा आंब्याची कमी प्रमाणात खरेदी केली असल्याचे आढळून आले आहे. परिणामी आंब्याचा दर आता थेट ६२ रुपयांवरून प्रती किलो थेट १७ रुपयांपर्यंत खाली घसरला आहे.

अवकाळी पाऊस आणि बदलत्या हवामानामुळे दहा ते पंधरा टक्के इतकेच आंब्याचे पीक यंदा हाती लागले. एकीकडे ही परिस्थिती असताना 'कॅनिंग'च्या आंब्यांचे दर कमालीचे घसरल्याने शेतकरी-बागायतदारांवर दुहेरी संकट ओढवले आहे.

'कॅनिंग'चा दर सुरुवातीला ६२ रुपये प्रति किलो इतका होता. त्यानंतर टप्प्याटप्प्याने हा दर घसरत जाऊन आता तो १७ रुपये प्रति किलो इतका खाली आला आहे. आंब्यापासून रस (पल्प),जाम, आंबा वडी, सरबते,लोणची, चॉकलेट आदी विविध खाद्य पदार्थ तयार केले जातात. सिंधुदुगार्तील अनेक महिला बचत गट हा उद्योग करत आहेत. शिवाय आईस्क्रीमसाठी या आंब्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. आईस्क्रीम उद्योगातील मोठमोठ्या कंपन्यांमार्फत या आंब्यांची खरेदी केली जाते. मात्र शेतकरी - बागायतदारांना हवा तसा दर दिला जात नाही.



परिणामी त्यांना नुकसान सोसावे लागते.परदेशात 'पल्प'ला मोठी मागणी आहे. मात्र आखाती युद्धामुळे यंदा नियार्तीवर परिणाम होण्याची शक्यता असल्याने शेतकरी -बागायतदार धास्तावले आहेत.

आंब्याला नुकसान भरपाई मिळावी यासाठी गेले महिनाभर आंदोलने, मोर्चे काढण्यात आले. राज्य सरकारने नुकसान भरपाई जाहीर केली. मात्र जाहीर केलेली रक्कम अत्यंत तुटपुंजी असल्याचे म्हणत आंदोलन अधिक तीव्र करण्यात आले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली कोकणातील शेतकरी-बागायतदारांनी मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा 'निवासस्थानी धडक देण्याचा निर्णय घेतला त्यानुसार मोचार्ही निघाला. मात्र पोलिसांनी धरपकड केल्याने आंदोलनाची हवाच गेली.

आंबा काढणीनंतर प्रतवारी झाल्यावर उरलेला आंबा हा प्रक्रिया उद्योगांना (कॅनिंग) दिला जातो. त्यामुळे मिळेल त्या दराने आंबा द्यावा लागतो आणि त्याला पर्याय नसतो. यातून संभाव्य नुकसान टाळण्यासाठी 'कॅनिंग'च्या आंब्याला हमीभाव मिळावा ही शेतकरी आणि बागायतदारांची फार जुनी मागणी आहे. परंतु शासन दरबारी याही मागणीची दखल घेतली गेली नसल्यामुळे आता त्यांच्यासमोर दुहेरी संकट उभे राहिले आहे.

कॅनिंग आंब्याला हमीभाव हवा

'कॅनिंग'च्या आंब्याला हमीभाव मिळावा ही शेतकरी-बागायतदारांची मागणी सरकारने मान्य केल्यास हाही प्रश्न सुटू शकतो असे त्यांचे मत आहे. गेल्या वषीर्पेक्षा यंदा ३० टक्के आंबाच 'कॅनिंग' उद्योगाला गेला आहे. त्यातही फळमाशीचा प्रादुर्भाव, आंब्यांची हाताळणी करताना होणारे फळांचे नुकसान यामुळे प्रक्रिया उद्योगाकडे गेलेला सुमारे २० टक्के आंबा हा फेकून द्यावा लागला. याचाही परिणाम 'कॅनिंग'चे दर घसरण्यावर झाला आहे. परिणामी प्रक्रिया उद्योगांनीही सावधगिरी बाळगत खरेदीचे प्रमाण कमी केले आहे. त्यामुळे शेतकरी-बागायतदारांची चिंता आणखी वाढली आहे.'

9 महिन्यांच्या मुलीचे यकृत प्रत्यारोपण

■मुंबई। प्रतिनिधी,

लहान मुलांमध्ये यकृत प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया आव्हानात्मक असते. मात्र बिहारहून आलेल्या एका नऊ महिन्यांच्या बाळावर मुंबईतील महापालिकेच्या नायर रुग्णालयाच्या सहकार्याने खासगी रुग्णालयामध्ये यशस्वी यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली. सोना (नाव बदलले आहे) ही अवघ्या चार महिन्यांची असताना तिला बिलिअरी अट्रेशिया या गंभीर आजाराचे निदान झाले होते. या यकृतविकाराच्या प्रगत स्थितीमध्ये तिचे वजन ५.८ किलो होते. त्यासह पोर्टल व्हेन अट्रेशिया यांसारखी गंभीर वैद्यकीय गुंतागुंत होती. या मुलीचे पालक वैद्यकीय उपचारासाठी तिला मुंबई महापालिकेच्या नायर रुग्णालयामध्ये घेऊन येत. मात्र कावीळ आणि यकृतासंदर्भातील इतर गुंतागुंतींमुळे तिची प्रकृती बिघडली. त्यावेळी गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. अनिल तांबे यांचे वैद्यकीय मत घेण्यात आले. डॉ. तांबे नायर रुग्णालयामध्ये मानद डॉक्टर म्हणून वैद्यकीय सेवा देतात. या बालरुग्णाला यकृत प्रत्यारोपणाची गरज असल्याचे निदान झाले. बाळाच्या वडिलांनी यकृतदान करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आवश्यक वैद्यकीय तपासण्या आणि उपचार सुरू करण्यात आले. नायर रुग्णालयामध्ये यासाठी लागणाऱ्या वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. प्रत्यारोपण समितीसह इतर वैद्यकीय प्रक्रिया या खासगी रुग्णालयांमध्ये पूर्ण करण्यात आल्या. या कुटुंबासमोर खचार्चेही आव्हान होते. अनेक वैद्यकीय तसेच धर्मादाय संस्था या कुटुंबाच्या पाठीमागे भक्कम उभ्या राहिल्या.

पोटच्या मुलांचा विचारही केला नाही, आईने प्रियकरासोबत मिळून सगळंच संपवलं

■मुंबई। प्रतिनिधी,

एक अत्यंत धक्कादायक आणि थरारक हत्याकांडाची घटना समोर आली आहे. येथे एका महिलेने आपल्या प्रियकरासोबत मिळून नवऱ्याची निर्घृण हत्या केली आणि त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी त्याचा मृतदेह एका शेतात खड्डा खणून पुरला. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, पोलीस आता या प्रकरणाच्या प्रत्येक बाजूने सखोल तपास करत आहेत. या संपूर्ण कटात आणखी कोणाचा सहभाग होता का, याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे. तेलंगणाच्या संगारेड्डी जिल्ह्यातील ही घटना आहे.

बायकोच्या प्रेमसंबंधांमुळे कुटुंबात तणाव

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुथ्यम रेड्डी (42) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव असून, तो गंगापूर गावचा रहिवासी होता. सुमारे 12 वर्षांपूर्वी त्याचा विवाह कल्पनासोबत झाला होता. त्यांना दोन मुले असून त्यांचे कुटुंब सुरुवातीला आनंदाने जगत होते. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून पती-पत्नीमध्ये सतत वाद होत होते. गावकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कल्पनाच्या कथित प्रेमसंबंधांमुळे कुटुंबात मोठा तणाव निर्माण झाला होता आणि याच वादातून अखेर हा भयानक गुन्हा घडला.

'अशी' केली हत्या

तपासात समोर आले आहे की, सुमारे तीन महिन्यांपूर्वी कल्पनाची ओळख गैनी पंडारी याच्याशी झाली होती. हळूहळू त्यांच्यात जवळीक वाढली आणि प्रेमसंबंध निर्माण झाले. जेव्हा मुथ्यम रेड्डीला या प्रकरणाची माहिती मिळाली, तेव्हा घरात रोज भांडणे होऊ लागली. मुथ्यम या नात्याला कडक विरोध करत असल्याने, कल्पना आणि पंडारी त्याला आपल्या मागार्तील अडथळा मानू लागले होते. याच कारणातून दोघांनी त्याच्या हत्येचा कट रचला. आरोपी महिला आणि तिच्या प्रियकराने मिळून मुथ्यमची हत्या केली आणि त्यानंतर मृतदेह गावाबाहेर एका शेतात नेऊन, जेसीबी मशीनच्या साहाय्याने खड्डा खणून तिथे पुरला. पुरावे नष्ट करण्यासाठी त्यांनी तो खड्डा माती आणि दगडांनी व्यवस्थित झाकून टाकला होता.

'साहेब, नवरा बेपत्ता झालाय'

नवऱ्याला आपल्या मागार्तून बाजूला सारल्यानंतर आरोपींनी पोलिसांची दिशाभूल करण्याचाही प्रयत्न केला. याच महिन्याच्या 18 तारखेला कल्पनाने खेड पोलीस ठाण्यात नवरा बेपत्ता झाल्याची खोटी तक्रार नोंदवली. मात्र, चौकशीदरम्यान पोलिसांना तिच्या वर्तनावर संशय आला. पोलिसांनी जेव्हा तिच्या मोबाईलचे कॉल डिटेल्स तपासले, तेव्हा कल्पना आणि गैनी पंडारी यांच्यात सतत संभाषण होत असल्याचे उघड झाले, ज्यामुळे पोलिसांचा संशय बळावला.

मुलांचे भविष्य अधांतरी

संशयाच्या आधारे पोलिसांनी पंडारीला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता, त्याने हत्येची कबुली दिली. डीएसपी व्यंकट रेड्डी यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने मृतदेह पुरलेली जागा दाखवली. त्यानंतर पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले आणि स्थानिक तहसीलदारांच्या उपस्थितीत पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. आता मृतदेह जमिनीतून बाहेर काढून शवविच्छेदनासाठी पाठवण्याची तयारी सुरू आहे. या घटनेमुळे संगारेड्डी जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडाली असून, पोलीस न्यायालयात मजबूत दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी सर्व तांत्रिक आणि फॉरेन्सिक पुरावे गोळा करत आहेत. तर दुसरीकडे, या घटनेमुळे मुलांच्या भविष्याबद्दल गावकऱ्यांकडून चिंता व्यक्त केली जात आहे.




बुलढाण्यात बापानं चारही पोरांना विहिरीत फेकलं अन्...

■विरार। प्रतिनिधी,

बुलढाणा जिल्ह्यात मन सून्न करून टाकणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे, जिथे विहिरीत पाच मृतदेह आढळून आले आहेत. जिल्ह्यातील जामोद पोलीस ठाणे परिसरातील भाले अंजन गावाजवळ एका विहिरीत पाच मृतदेह पाण्यात तरंगत असल्याची माहिती समोर आली. या प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांचं पथक घटनास्थळी पोहोचले होते. जळगाव जामोद पोलीस ठाण्याचे अधिकारी नितीन पाटील यांनी आज तक या वृत्तमाध्यमाशी बोलताना माहिती दिली.

पती-पत्नीत झालेल्या वादातून दुदैवी घटना

नितीन पाटील म्हणाले की, पती-पत्नीत झालेल्या वादातून ही दुदैवी घटना घडली आहे. मृत पती विजय मुसा किरडिया आणि पत्नी यांच्यात सातत्याने वाद होत होता. काही दिवसांपूर्वीच त्याने पत्नीला तिच्या माहेरी सोडले आणि मुलांसोबत एकटा राहत होता. अचानक सकाळी विहिरीत पाच मृतदेह आढळून आले होते.



पोटच्या चारही लेकरांना विहिरीत फेकलं

याच मृतदेहांवरून अंदाज लावण्यात आला की, रविवारी वडिलांनी प्रथम आपल्या 7, 5, 4 आणि 2 वर्षाच्या मुलांना विहिरीत फेकून दिलं, नंतर विहिरीतून पाणी काढण्याच्या लाकडाला गळफास घेत आपलं जीवन संपवलं. पोलिसांनी मृतदेह ग्रामीण रूग्णालयात पाठवला. जळगाव जामोद पोलिसांनी गुन्हा दाखल करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले आणि तपास सुरू ठेवला.

संबंधित प्रकरणात अनेकदा दिसून आले की, नवरा-बायकोमधील वादामुळे हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. कौटुंबिक वादातूनच हे प्रकरण घडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com